रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड मंगळवार । दि. २९ सप्टेंबर २०२६ । अंक ११३ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## एनडीएसोबत जाणार नाही : पवार

**मुंबई :** गेल्या अनेक महिन्यांपासून राजकीय वर्तुळात शरद पवार हे भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएसोबत जाणार, अशा चर्चा रंगल्या होत्या. मध्यंतरी पंतप्रधान मोदी यांच्याशी भेट झाल्यामुळे या चर्चांना आणखीनच हवा मिळाली होती. मात्र, सोमवारी (दि.२८) मुंबईत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात शरद पवार यांनी आपण एनडीएसोबत जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यासोबतच शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री आणि अजित पवार गटाच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवार यांना अप्रत्यक्षरित्या संदेश दिला. पान २ वर

## शिंदेंच्या कार्यकर्त्याला महिलांकडून चोप

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला मानला जाणाऱ्या ठाण्यात खळबळजनक घटना घडली आहे. शिंदेंच्या कार्यकर्त्याला महिलांनी चोप दिल्याचा प्रकार समोर आला आहे. पोलिसांसमोरच हा प्रकार घडला असून, या घटनेचा व्हिडिओ समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ठाण्यातील कोपरी परिसरात रविवारी (दि.२७) रात्री सुमारे सव्वाअकरा वाजता जुन्या कपड्यांचा व्यवसाय करणाऱ्या काही महिलांनी शिवसेना शिंदे पक्षाचा कार्यकर्ता सिद्धू अभंगे याला मारहाण केली आहे. त्याने व्यवसाय करण्यासाठी महिलांकडे पैसे मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## केमिकल कंपनीत भीषण आग

# स्फोटाने महाड हादरले



सहा जण जखमी

। महाड । प्रतिनिधी ।

महाड एमआयडीसीमध्ये गेली काही वर्षे कार्यरत असलेली सिनर्जीया केम इंडस्ट्रीज कंपनीत रविवारी (दि.२७) रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास भीषण स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कंपनीतील सहा जण जखमी झाले आहे. त्यातील एकाची प्रकृती गंभीर असून, त्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्रीच्या सुमारास महाड एमआयडीसीतील सिनर्जीया केम इंडस्ट्रीज कंपनीमध्ये केमिकल टँकचा अचानक भीषण स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता एवढी मोठी होती की, कंपनीतील लोखंडी तसेच सिमेंटचे स्ट्रक्चर मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाले असून, काही भाग हवेत उडाल्याची माहिती समोर आली आहे. या स्फोटामुळे परिसरातील अन्य कारखान्यांनाही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्राथमिक माहितीतून समोर येत आहे. या भीषण स्फोटात सहा जण जखमी झाल्याची माहिती समोर आली असून, जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी पाच जणांना उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला पान २ वर

### कपंनीचा सुपरवायझर गंभीर

या भीषण स्फोटात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, सहा जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये कंपनीतील सुपरवायझर शेलटोली गावचे रहिवासी नितीन लाड हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर महाडमधील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इतर पाच जणांना उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.

### स्फोटाचे कारण अद्याप अस्पष्ट

कंपनीतील केमिकल टँकचा स्फोट नेमका कशामुळे झाला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित विभागाकडून घटनास्थळाची पाहणी करून स्फोटामागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. कंपनीतील सुरक्षा व्यवस्था, टँकची स्थिती आणि अन्य तांत्रिक बाबींची तपासणी केल्यानंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## आज साखरचौथ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अकरा दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनानंतर साखरचौथच्या गणरायाच्या आगमनाची प्रतिक्षा लागून राहिली होती. अखेर ही उत्कंठा संपली असून, जिल्ह्यामध्ये मंगळवारी (दि.२९) साखरचौथच्या ८८५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. त्यात ३९० सार्वजनिक व ४९५ घरगूती गणेशमुर्तींचा समावेश आहे. यावेळी मिरवणूक काढत बाप्पाचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे.

मूर्तीकार मूर्ती तयार करण्यामध्ये मग्न असल्याने गणेशोत्सवामध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करता येत नाही. त्यामुळे दहा दिवसांच्या बाप्पाच्या निरोपानंतर साखरचौथच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते, असे काही मंडळींकडून सांगण्यात आले आहे. तसेच, काही ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून मित्रमंडळ एकत्र येत गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून साखरचौथ गणरायाची मनोभावे पुजा करतात. त्यामुळे साखरचौथ गणेशमूर्ती प्रतिष्ठापनेचा उत्साह वाढू लागला आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील हा क्रेझ वाढत आहे. तसेच, दीड दिवसांच्या या बाप्पाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहेत.

यंदा जिल्ह्यामध्ये ८०० हून अधिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना मंगळवारी करण्यात येणार आहे. काही ठिकाणी मिरवणूक काढत वाजत गाजत बाप्पाचे स्वागत केले जाणार आहे. तर, काही ठिकाणी डोक्यावर आणत पारंपारिक पद्धतीने बाप्पाचे स्वागत केले जाणार आहे. त्यानंतर विधीवत पुजा झाल्यावर मूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. तसेच, दुपारपासून ते संध्याकाळपर्यंत सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान, साखरचौथच्या बाप्पाच्या स्वागतासाठी लागणारे पान २ वर

## निवडणूक आयुक्तांच्या बडतर्फसाठी काँग्रेस आक्रमक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

एसआयआर अर्थात विशेष सखोल पुनरावृत्ती प्रक्रियेतील भोंगळ कारभारासह मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप रायगडच्या काँग्रेसने केला आहे. आयुक्तांना बडतर्फ करून अटक करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस आक्रमक होऊन रस्त्यावर उतरले. भाजपच्या जून्या कार्यालयासमोर निवडणूक आयुक्त ज्ञानेश्वर कुमार यांचे छायाचित्र जाळून त्यांच्या कारभाराबाबत तीव्र निषेध व्यक्त केला. काँग्रेसने ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत काँग्रेस भवन ते जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करून दोष पान २ वर

### काँग्रेस भवन ते जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



(छायाचित्र : समीर मालोदे)

## वेधक



### बोरघाटात कंटेनरची टेम्पोला धडक

**खोपोली :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत सोमवारी (दि.२८) सकाळी एका कंटेनरने एका टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेनंतर दोन्ही वाहने महामार्गालगतच्या सुमारे ५० फूट खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत कंटेनर चालकाचा जागीच मृत्यू झाला असून, टेम्पो चालक जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर चालक मोहमद कैफ (वय २४) हा पुण्याहून पान २ वर



### जेएनपीटी-पळस्पेवरील गाळ्यांना आग

**खांदेश्वर :** जेएनपीटी-पळस्पे महामार्गावरील साई वर्ल्ड सिटीच्या मागील बाजूस असलेल्या गाळ्यांना रविवारी (दि.२८) रात्रीच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. या आगीत एकूण चार गाळे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. मात्र, अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग आटोक्यात आणण्यात आली असून, या घटनेत कोणतीही पान २ वर

## १४ तालुक्यांतील शेतकरी मदतीपासून वंचित




। पेण । प्रतिनिधी ।

राज्य सरकारने नुकतेच जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत रायगडमधून केवळ श्रीवर्धन तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. यंदाच्या खरीप हंगामातील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य दुष्काळी निकषांच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांत 'ट्रिगर-१' लागू करण्यात आला आहे. मात्र, यंदा रायगड जिल्ह्यात भातशेतीचे मोठे नुकसान झाले असतानाही फक्त श्रीवर्धन तालुक्याचा यादीत समावेश केल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर देखील प्रश्नचिन्ही उभे राहत आहे.

रायगडमधील विविध तालुक्यांत भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आकडेवारीनुसार माणगावमध्ये सुमारे ११ हजार हेक्टर, महाडमध्ये ९,५०० हेक्टर, पेणमध्ये ९ हजार हेक्टर, रोह्यात ८,५०० हेक्टर आणि अलिबागमध्ये ८,५०० हेक्टर भातशेतीचे क्षेत्र नुकसानग्रस्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ एका तालुक्याला दुष्काळग्रस्त घोषित करण्याच्या निर्णयावर आता प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, सध्याच्या परिस्थितीत भात पीक दाणे भरण्याच्या संवेदनशील अवस्थेत असताना पावसाने ओढ दिल्यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रायगड जिल्ह्यात सरासरीच्या सुमारे ९१ टक्के पावसाची नोंद झाली असली, तरी श्रीवर्धन आणि म्हसळा या तालुक्यांत पर्जन्यमानात सुमारे २० टक्के घट झाल्याचे अलीकडील वृत्तांत नमूद आहे.

पेण आणि महाडसारख्या तालुक्यांमध्ये मोठ्या क्षेत्रावरील भातशेतीचे नुकसान झाल्याचे आकडे समोर येत असताना हे तालुके दुष्काळग्रस्त यादीबाहेर का राहिले, असा सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित होत आहे. नुकसानाचे पंचनामे, प्रत्यक्ष पीक परिस्थिती आणि दुष्काळ जाहीर करण्यासाठी वापरलेले निकष यांची तालुकानिहाय पारदर्शक माहिती शासनाने जाहीर करावी, पान २ वर

## दिव्यांगाच्या जागेवर 'लोना'चा डोळा?



- शेतकऱ्यांच्या जागेत सांडपाण्याची वाहिनी टाकण्याचा घाट
- जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

कर्जत तालुक्यातील लाडीवली येथील एका दिव्यांग शेतकऱ्याच्या जागेतून लोना कंपनीने सांडपाणीची वाहीनी टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पिता पुत्रांनी न्यायासाठी अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले आहे. या प्रकारामुळे दिव्यांगाच्या जागेवर लोना कंपनीचा डोळा असल्याचे बोलले जात आहे.

निवेदनातून मिळालेल्या माहितीनुसार, गणेश म्हामणकर असे या दिव्यांग शेतकऱ्याचे नाव आहे. हा शेतकरी दृष्टीहीन आहे. त्यांच्या लाडीवली येथील स. नं. ३४/८ अ या जागेतून लोना इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड या कंपनीने सांडपाणी जाण्यासाठी वाहीनी टाकली. मात्र, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता ही वाहीनी टाकल्याचा आरोप म्हामणकर यांनी केला आहे. याबाबत स्थानिक पातळीवर अनेक वेळा निवेदन देण्यात आले आहे. मात्र, कारवाई झालेली नाही. ते गेल्या पंधरा वर्षांपासून न्यायासाठी लढा देत आहेत. मात्र, संबंधित प्रशासनाकडून कागदी घोडे नाचवले जात आहेत. प्रत्यक्षात कोणताही ठोस कारवाई होत नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या दिव्यांग व्यक्तीने अलिबागमधील जिल्हाधिकारी पान २ वर

> आमच्या मालकीच्या जागेतून लोणा इंडस्ट्रीज प्रा लि. या कंपनीच्या सांडपाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली आहे. ही पाईप लाईन काढण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून पंचायत समिती स्तरापासून भूमी अभिलेख व महसूल विभागाकडे दाद मागण्या आली आहे. परंतु, न्याय मिळाले नाही. म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मुलासमवेत उपोषणाला बसलो आहे. न्याय मिळेपर्यंत हा लढा असणार आहे.
>
> – गणेश म्हामणकर, उपोषणकर्ते

## घाटात मच्छीचा कंटेनर पलटी



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील धामणदेवी गावाजवळ सोमवारी (दि.२८) ओल्या मच्छीने भरलेला कंटेनर कलंडल्याची घटना घडली. यावेळी डिझेल टँकजवळ धूर निघत असल्याने प्रसंगावधान राखत दीड किलोमीटर अंतरावर एकेरी वाहतूक सुरू ठेवण्यात आली. त्यानंतर पोलादपूर पोलिसांनी जखमी चालकाला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. पान २ वर

## विद्यार्थ्यांच्या कलेला मिळणार रंगमंचातून संधी



- नगरपरिषद शाळेतील कामांचे भूमीपूजन
- बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांचा पुढाकार

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

अलिबाग नगर परिषद हद्दीतील मराठी शाळा क्रमांक एक आणि दोनच्या परिसरात अद्ययावत असे रंगमंच उभारले जाणार आहे. तसेच, शाळेच्या इमारतीवरील टेरेसवर शेडचे बांधकाम केले जाणार आहे. या कामांचे भूमीपूजन सोमवारी (दि.२८) करण्यात आले. हा उपक्रम अलिबागचे बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या पुढाकाराने हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे नगरपरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना या रंगमंचातून हक्काचे कायम स्वरुपी व्यासपीठ खुले होणार आहे.

हा भूमीपूजन पान २ वर






# लोकसभेपेक्षा विधानसभेला ७१ लाख मतदार अधिक!

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या एका महिन्यात तब्बल साडेसहा लाख मतदार वाढले कसे? हे मतदार आले कुठून आणि त्यांची नोंदणी कशी झाली? असा थेट सवाल आमदार रोहित पवार यांनी निवडणूक आयोगाला केला आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी मतदारयादी, एसआयआर आणि ईव्हीएमबाबत गंभीर आरोप केले. सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी मुंबईत पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

रोहित पवार यांनी सांगितले की, लोकसभेच्या सहा महिन्यांच्या कालावधीत सुमारे ६.५ लाख मतदार वाढले; मात्र विधानसभा निवडणुकीपूर्वी केवळ एका महिन्यात पुन्हा सुमारे ६.५ लाख मतदार वाढल्याचा दावा त्यांनी केला. लोकसभेपेक्षा विधानसभेला तब्बल ७१ लाख अधिक मतदान झाले असून, या संपूर्ण प्रक्रियेबाबत राज्यात ईव्हीएम 'मॅनेज' केल्याची चर्चा असल्याचेही त्यांनी म्हटले.

मतदारयादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींना जिवंत तर जिवंत व्यक्तींना मृत दाखविणे तसेच कायमस्वरूपी स्थलांतरित दाखविण्याच्या प्रकरणांकडेही पवार यांनी लक्ष वेधले. पत्रकार परिषदेत त्यांनी एका जिवंत व्यक्तीला एसआयआर यादीत मृत दाखविल्याचा दावा करत व्हिडिओ कॉलद्वारे त्याचा पुरावाही दाखविला.

महाराष्ट्रातील एसआयआर प्रक्रियेत दोन कोटींहून अधिक नावे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट झालेली नाहीत. मात्र ही नावे अंतिमतः वगळण्यात आली आहेत, असे समजणे योग्य नसून, निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यामागे अनुपलब्ध, मृत किंवा स्थलांतरित मतदारांसह विविध कारणे नमूद केली आहेत.

ईव्हीएम, मतदारयादी आणि 'पिपाणी' चिन्हाच्या मुद्द्यावरही पवार यांनी निवडणूक आयोगावर टीका केली. लोकशाहीच्या रक्षणासाठी ईव्हीएमविरोधातही मोठे आंदोलन उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## जाहीर नोटीस

दिनांक : २९ सप्टेंबर २०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - मोग्रज, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| किशोर नाथ गोस्वामी | १३ | २/ब/१ | ३-४७-०० | २ | ६१ |
| | या पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र हे ० आर ०८ पॉ ० मात्र. | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे, कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :-२९/०९/२०२६

## पान १ वरुन

### स्फोटाने महाड हादरले

आहे. मात्र, कंपनीतील सुपरवायझर नितीन लाड यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. घटनास्थळी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असून, सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. तसेच, या स्फोटानंतर परिसरात गॅस गळती झाल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र, घटनास्थळी कोणत्याही प्रकारची वायू अथवा गॅस गळती झालेली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, नागरिकांनी घटनास्थळाबाबत कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा अप्रमाणित माहिती सोशल मीडियावर प्रसारित करू नये. प्रशासन आणि पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन देखील करण्यात आले.

### १४ तालुक्यांतील शेतकरी मदतीपासून वंचित

अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, मंत्री आदिती तटकरे या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाच्या आमदार असून, त्या महाराष्ट्राच्या महिला व बाल विकास मंत्री आहेत. तर सुनील तटकरे हे रायगड लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार आहेत. त्यामुळे आता शेतकऱ्यांचा सवाल आहे की, श्रीवर्धनच्या शेतकऱ्यांना दुष्काळी सवलती मिळणे स्वागतार्ह असले, तरी रायगडच्या इतर तालुक्यांतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा आवाजही तितक्याच ताकदीने शासनदरबारी पोहोचणार का? श्रीवर्धनचा समावेश झाला म्हणून त्याला विरोध नाही; मात्र महाड, पेण, माणगाव, रोहा, अलिबाग आणि अन्य तालुक्यांतील नुकसानाकडे दुर्लक्ष होता कामा नये, अशी शेतकरी वर्गाची अपेक्षा आहे.

### दिव्यांगाच्या जागेवर 'लोना'चा डोळा?

कार्यालयासमोर न्यायासाठी उपोषण सुरु केले आहे. यावेळी ही वाहीनी काढण्यात यावी, अशी मागणी गणेश म्हामणकर यांनी केली आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या जागेतूनच सांडपाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली आहे. सर्व विभागाची परवानगी घेऊनच काम करण्यात आले आहे. संबंधित उपोषणकर्ते यांच्या जागेचा संबंध येत नाही.**

**– राजेंद्र पाटील, व्यवस्थापक, एचआर विभाग, लोना इंडस्ट्रीज**

### विद्यार्थ्यांच्या कलेला मिळणार रंगमंचातून संधी

सोहळा बांधकाम सभापती प्रशांत नाईक व उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी ॲड. निलम हजारे, ॲड. अश्वीनी ठोसर, ॲड. ऋषिकेश माळी, ॲड. निवेदिता वाघमारे, जमाल सय्यद, योजना पाटील, कैसर दणदणे, ॲड. अंकीत बंगेरा, नगर अभियंता संतोष मुंडे, सर्व नगरसेवक, नगरपरिषद शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानंतर्गत नगरपरिषद हद्दीतील मराठी शाळा क्रमांक एक व दोनच्या परिसरात रंगमंच बांधकाम व शाळेच्या इमारतीवरील टेरेसवर शेड उभारली जाणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच वेगवेगळे उपक्रम राबवित असताना रंगमंचाद्वारे कला सादर करण्याचे हक्काचे व्यासपिठ मिळावे, यासाठी अद्ययावत असे रंगमंच बांधले जाणार आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम दरवर्षी होतात. या सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी चांगल्या अद्ययावत रंगमंचातून मिळावी, यासाठी शाळा क्रमांक एक व दोन मध्ये रंगमंच उभारले जाणार आहे. शाळेच्या आवारात उभारण्यात येणाऱ्या रंगमंचातून विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, वक्तृत्व, नृत्य नाट्य सादरीकरणासह शालेय उपक्रमांसाठी कायम स्वरुपी जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये या कामाची भर पडणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि आत्म विश्वासाला व्यासपिठ मिळावे, यासाठी शाळेच्या आावारात कायमच स्वरुपी रंगमच उभारले जाणार आहे. शाळेच्या विविध सुविधांसह विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला प्राधान्य देण्यासाठी अद्ययावत असे रंगमंच उभारले जाणार आहे.**

**– प्रशांत नाईक, बांधकाम सभापती, अलिबाग नगरपरिषद**

### बोरघाटात कंटेनरची टेम्पोला धडक

मुंबईच्या दिशेने जात होता. बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत आल्यानंतर त्याचे कंटेनरवरील नियंत्रण सुटले आणि पुढे जाणाऱ्या टाटा टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेनंतर दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल दरीत कोसळली. या अपघातात कंटेनरच्या केबिनमध्ये चालक मोहमद कैफ अडकला. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. तर टेम्पो चालक मीराज शेख (२९) हा जखमी झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा, हेल्प फऊंडेशनचे सदस्य, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, लोकमान्य हॉस्पिटलची रुग्णवाहिका आणि एफकॉन कंपनीची टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. बचाव पथकांनी दरीत उतरून अपघातग्रस्त वाहनांमध्ये अडकलेल्या जखमी टेम्पो चालकाला बाहेर काढले. त्याला पुढील उपचारासाठी खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता.

### एनडीएसोबत जाणार नाही : पवार

ते म्हणाले की, आपल्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. मला त्यांना सांगायच आहे. आपण कुठेही जाणार नाही. आम्ही कुणासोबत जाणार नाही. यायचं असेल तर आमच्यासोबत या, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आगामी काळात शरद पवार यांचा पक्ष राज्यात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडीसोबत राहून काम करेल, हे स्पष्ट झाले आहे.

### जेएनपीटी-पळस्पेवरील गाळ्यांना आग

जीवितहानी झाल्याची नोंद नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, अग्निशमन दलाला रात्री सात वाजण्याच्या सुमारास आगीची वर्दी मिळाली. अभिमन्यू लांडगे यांनी माहिती दिल्यानंतर अग्निशमन दल घटनास्थळी रवाना करण्यात आले. घटनास्थळी पोहोचल्यानंतर चार गाळ्यांना आग लागल्याचे निदर्शनास आले. त्यामध्ये एसी कॉम्प्रेसर व गॅस रिफिलचे साहित्य, फरसाण व चिप्स निर्मिती कारखाना, फर्निचर तसेच सीलिंग पीव्हीसी शीटचा गाळा यांचा समावेश होता. यावेळी आग विझविण्यासाठी होज रील तसेच दोन होजची एक लाईन टाकून पाण्याचा मारा करण्यात आला. त्यानंतर गाळ्यांमधील साहित्य थंड करण्याचे काम सुरू करण्यात आले. आगीवर नियंत्रण मिळविताना गाळ्यांचे शेल्टर अडथळा ठरत असल्याने घटनास्थळी जेसीबी बोलावून शेल्टर तोडण्यात आले. तसेच, जळालेले व नुकसानग्रस्त साहित्य बाहेर काढून त्याचा साल्वेज जमा करण्याचे काम करण्यात आले. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून त्याबाबत तपास सुरू आहे.

### आज साखरचौथ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना

साहित्य खरेदीसाठी सोमवारी (दि.२८) सायंकाळी जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये गर्दी झाली होती. यावेळी पुजेच्या साहित्यांसह, फुले, फळे सजावटीसाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी बाजारपेठा फुल्ल झाल्या होत्या. अलिबागमधी ठिकरूळ नाका येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने १७ वर्षाची परंपरा जपली आहे. या मंडळातर्फे दरवर्षी वेगवेगळे समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. यावर्षी येथील महिलांनी एकत्र येत पारंपारिक लेझीमचे सादरीकरण करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

### निवडणूक आयुक्तांच्या बडतर्फसाठी काँग्रेस आक्रमक

आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवडणूका स्वतंत्र व निपक्षपणे पार पडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. स्वायत्त असलेला निवडणूक आयोग मागील काही वर्षापासून सत्ताधारी पक्षाच्या हातातील बाहुले बनले आहे. निवडणूक आयोग सत्ताधारी भाजपसाठी निवडणूकीत मॅच फिक्सींग करीत असल्याचा संशय रायगडच्या जिल्हा काँग्रेसने व्यक्त केला. एसआयआरच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात मतदारांची नावे काढण्यात आली आहेत असाही आरोप त्यांनी केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे एकतर्फी निर्णय घेत असल्याचे त्यांचे सहकारी निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग सिंधू, आणि विवेक जोशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकात स्पष्ट केले आहे. ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयावर दहा महिन्यात १४ वेळा त्यांनी अधिकृतपणे आक्षेप नोंदविला आहे. निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदांबाबतचा दाखला काँग्रेसने दिला आहे.मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभारामुळे एसआयआरच्या कामकाजाबाबतही संशय व्यक्त करीत रायगड जिल्ह्यातील काँग्रेस सोमवारी रस्त्यावर उतरले. निवडणूक आयोगाने बोगस मतदार वाढविल्याचा आरोप काँग्रेसने करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. ज्ञानेश कुमार यांची कृती देशद्रोहाची असून त्यांनी लोकशाही व संविधानिक मुल्ये पायदळी तुडविल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ज्ञानेश कुमार यांना बडतर्फ करण्यात यावे, सखोल चौकशी करून त्यांना अटक करण्यात यावी अशी मागी जोर धरत काँग्रेस भवन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. दरम्यान भाजपच्या जून्या कार्यालयासमोर केंद्र सरकार विरोधात घोषणा देत ज्ञानेशकुमार यांचे छायाचित्र जाळले. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राजाभाऊ ठाकूर, ॲड. श्रध्दा ठाकूर, श्रुती म्हात्रे,डॉ. मनीष पाटील , नंदा म्हात्रे, मिलींद पाडगांवकर,योगेश मगर, काका ठाकूर,अशोक मोकल, नगरसेवक समीर ठाकूर, भास्कर चव्हाण आदी जिल्हा, तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### घाटात मच्छीचा कंटेनर पलटी

तर, महाड एमआयडीसीच्या अग्निशमन बंबाने तात्काळ धुरावर नियंत्रण मिळवून कंटेनर रस्त्याच्या बाजूला उभा केला.मिळालेल्या माहितीनुसार, कशेडी घाटात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर सोमवारी दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास अलिबाग येथून मासळी घेऊन ट्रक रत्नागिरीच्या दिशेने जात होतो. तो ट्रक धामणदिवी गावालगत आला आणि कलंडला. दुपारची वेळ आणि टळटळीत उन्हामुळे कंटेनरच्या डिझेल टँकजवळून धुराचे लोट उठू लागले. या अपघाताची माहिती पोलादपूर पोलिसांना मिळताच त्यांनी घटणास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी ट्रक चालकाला पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात रवाना केले. यावेळी महाड औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन दलाने कंटेनरच्या डिझेल टँकजवळून निघणाऱ्या धुरावर पाण्याचा मारा करून आग पुर्णपणे नियंत्रणात आणली. तब्बल दीड तासानंतर कलंडलेल्या कंटेनर जेसीबीच्या मदतीने रस्त्याच्या कडेला उभा करण्याची तयारी सुरू झाली. यादरम्यान, वाहतूक पोलीसांनी वाहतूक अन्नपूर्णा हॉटेल पासून गोव्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर वळवून अपघातस्थळी वाहतुकीची कोंडी होऊ नये याची दक्षता घेतली.

---

अर्जदार तर्फे वकील ॲड.आदेश शिरवटकर

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायधिश (क. स्तर) सो., यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज क्र.३९/२०२६
ने.७/ड
नेता.२८/१०/२६

१. रिजवान हमजा खान
वय - ४६ वर्षे, धंदा - गृहिणी
२.सलमान हमजा खान
वय - २७ वर्षे, धंदा- ड्रायव्हर
३. मुस्कान अब्दुल अजीज नजीर — अर्जदार
वय - २५ वर्षे, धंदा- गृहिणी
रा. म्हसळा, ता. म्हसळा, जि. रायगड ४०२ १०५
४. सुहेल हमजा खान
वय - २० वर्षे, धंदा- शिक्षण
अनु. क्र. १,२ व ४ रा. वडवली,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२ ४०३

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी ते कै. हमजा अब्दुलसमद खान यांचे वारस आहेत असा ठरवणारा दाखला मिळणेसाठी दिवाणी चौकशी अर्ज क्र.३९/२०२६ हा दाखल केलेला आहे. सदरचा वारस दाखला कै. हमजा अब्दुलसमद खान यांचे नावे असलेली बजाज मिनिडोर ही रिक्षा रजिस्ट्रेशन नंबर MH-06/S-3858 व परमिट क्र.MH06/55/SRD/2001 हे त्यांच्या नावे होण्यासाठी आवश्यक आहे.

तरी अर्जदार यांना सदरचा वारस दाखला देण्यास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी दि. २८/१०/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो श्रीवर्धन यांचे कोर्टात हजर राहून हरकत नोंदवावी. कोणी हजर न राहिल्यास अर्जदारांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

सदरची जाहिर नोटीस माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

श्रीवर्धन
तारीख : ११/०९/२०२६

सही /-
**कनिष्ठ लिपिक**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर**
**श्रीवर्धन-रायगड**

---

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.१०/३४३/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०९/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री/श्रीमती.-------------------
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.१०, मंगळवार दिनांक ०६/१०/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक १०, दिनांक ०६/१०/२०२६ ची विषयपत्रिका**

१. मागील विशेष सर्वसधारण सभा क्र.०७ दि.०७/०८/२०२६ (अर्थसंकल्प), सर्वसाधारण सभा क्र.०८ दि.२०/०८/२०२६ तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र.०९ दि.०९/०९/२०२६ रोजींच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे.
२. शासकीय पत्रव्यवहार
३. प्रश्नोत्तरे
४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :
१. दिनांक २४/०४/२०२६ रोजीचा स्थगित विषय - पनवेल महानगरपालिका हद्दीमधील प्रभाग समिती अ,ब,क व ड मध्ये अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निष्कासन करणेकामी मनुष्यबळ, यंत्रसामुग्री व वाहने पुरविणेकामी निविदा मागविणेबाबत.
२. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय पनवेल महानगरपालिकेचा सन २०२५-२६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ESR) मा. सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती-ब व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षाकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
४. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती-क, प्रभाग क्र.११,१२,१३ व १४ मध्ये समाविष्ठ होणाऱ्या गटारांची सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षाकरीता रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
५. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका मालकीच्या इमारतीची देखभाल व दुरुस्ती (नुतणीकरण) वार्षिक तत्वावर करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करिता) ६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, कामोठे येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करिता )
७. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड व इतर रस्त्यालगत असणाऱ्या गटार, पादचारी मार्गा मधील इन्स्पेक्शन चेंबर्स वर वेळोवेळी आवश्यकतेनुसार २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षाकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरुस्ती करणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड पनवेल येथील रस्त्यांवर महापालिका मालकीच्या मोकळ्या भुखंडावर वार्षिक तत्वावर माहिती दर्शक फलक बसविणे व रोड मार्किंग करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६-२७ व २०२७-२८ करिता )
९. रायगड जिल्हा परिषदेच्या एकूण ५१ शाळा पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणेबाबत.
१०. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील कळंबोली येथील लोकनेते दि.बा.पाटील मैदान, से.१०ई येथे पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
११. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पिसार्वे व करवले गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
१२. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील धानसर गाव व धानसर गावाकडे जाणारा रस्ता या ठिकाणी पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करणे.
१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल येथील सेक्टर ०८, भुखंड क्र. १२९ या उद्यानाची दुरुस्ती करणे.
१४. पनवेल महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता १०००० लिटर क्षमतेचे नवीन २० नग वॉटर टँकर वाहने खरेदी करणे.
१५. सन २०२६-२७ वर्षासाठी पनवेल महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रे, नागरी वर्धिनी केंद्रे येथे येणाऱ्या रुग्णांना औषधोपचार करण्याकरता ई-निविदा प्रसिद्ध करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.
१६. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील पनवेल महानगरपालिका शाळेय जिल्हास्तरीय विविध खेळांच्या क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यास अपेक्षित खर्चास सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.
(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये )

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- २८/०९/२०२६.

**सोबत** - विषयांचे गोषवारे तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र.०७ दि. ०७/०८/२०२६ (अर्थसंकल्प), सर्वसाधारण सभा क्र.०८ दि.२०/०८/२०२६ तसेच विशेष सर्वसधारण सभा क्र.०९ दि.०९/०९/२०२६ रोजीच्या सभांचे इतिवृत्त.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. सुरज दिलीप तुरे रा. सुकापूर, पनवेल-रायगड यांनी खालील वर्णनांची जमिन ही सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. अशोक जानू ओमले वगैरे-३ रा. रेवोळी, तालुका-पेण, जिल्हा-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी सुरु आहेत.

**मिळकतीचे वर्णन-** जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, तलाठी सजा-कोलेटी, ग्रुप ग्रामपंचायत पाबळ, मौजे- रेवोळी येथील सर्व्हे/गट नं. २८ क्षेत्र ०-६१-०० हे.आर.चौ.मी. त्यासी आकार रु २-१९ पैसे ही जमिन या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

सदरची जमिन ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत सदर जाहीर नोटीसीस कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरची ०-६१-०० हे. आर. चौ.मी. ही जमिन निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हित संबंध नाही असे गृहीत धरून माझे अशिल हे सदर जमिनीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड.
दि. ३०/०९/२०२६

सही/-
**ॲड. संजय भास्कर पाटील**
परमार प्लाझा, शॉप नं. १६. तळ मजला,
शिवाजी पथ पेण-रायगड ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

## CHANGE IN NAME

I, SAMINA KHALIL PEREKAR, residing at Shekhache Gaon, Narangi, P.O Narangi, Tal-Alibag, Raigad 4102209,Maharashtra,hereby declare that I am changing / correcting my name from "SAMINA KHALIL PEREKAR" to "SHAMINA KHALIL PEREKAR".

Henceforth, I shall be known and identified as "SHAMINA KHALIL PEREKAR" for all purposes and in all official records.

Both the names SAMINA KHALIL PEREKAR and SHAMINA KHALIL PEREKAR refer to one and the same person.

Date: 28/09/2026
Place: Alibag

Sd/-
New Name
**SHAMINA KHALIL PEREKAR**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची जमीन मिळकत, सामाईक जमीन मिळकतीचे मालक अनिता बळीराम म्हात्रे व जयेंद्र बळीराम म्हात्रे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव | १३८२ | क्षेत्र ०-१७-७०<br>पो.ख.०-०३-३०<br>एकूण ०-२१-०० | ४.६८ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.२८/०९/२०२६

**ॲड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो.कुर्डुस, ता.अलिबाग,
जि. रायगड मो.नं.८८०५५१८०६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्रीमती. मंगला राजन झांजी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| ३५ | १० | ०-७४-० | ०-७९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०९/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर हरकत

सर्व जनतेस सदरच्या जाहीर हरकतीने कळिवण्यात येते की, माझे वडील रामचंद्र हरी म्हात्रे, रा. मु.पो. किहिम, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे पूर्वगामी मालक गजानन कृष्णाजी नागवेकर व सरस्वती गजानन नागवेकर यांचेकडून मोबदल्यासह विकत घेतलेली होती. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| कामथ,ता.अलिबाग, जि.रायगड | ३४७ (किहिम जुना स.नं.१९६/१) | ०-१०-० | १-९४ |

वर नमुद मिळकतीचा मुळ सर्व्हे नं.१९६/१ असा आहे. सदर मिळकत मुळ गजानन कृष्णाजी नागवेकर व सरस्वती गजानन नागवेकर यांच्या मालकीची होती. गजानन कृष्णाजी नागवेकर व सरस्वती गजानन नागवेकर हे मयत असून त्यांचे मृत्यूपश्चात सदर मिळकतीचे ७/१२ सदरी आजमितीस १. सुमती जयराम रांजणकर, २. शकुंतला श्रीरंग लीडकर, ३. सुभाष भास्कर तोडणकर, ४. विकास भास्कर तोडणकर, ५. प्रेरणा प्रकाश तोडणकर, ६. प्रथमेश प्रकाश तोडणकर, ७. सिध्देश प्रकाश तोडणकर, ८. मारुती विनायक हळदणकर, ९. कल्पना विजय साठे, १०. माधुरी संतोष तिडके यांची नावे दाखल झाली आहेत.

परंतु, सदरहू मिळकत ही माझे वडील रामचंद्र हरी म्हात्रे यांनी विकत घेतलेली असून मिळकतीचा सर्व मोबदला देवून ताबा घेतलेला आहे. सदरचा ताबा सन १९७० पासून आजतागायत आमच्याकडेच आहे. असे असताना मिळकतीचे सध्याचे वारस हे वर नमुद मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तिचा हक्क निर्माण करु पहात आहेत. माझे वडील हे मयत असल्यामुळे त्यांची वारस व मिळकतीची ताबेदार म्हणून सदरचे व्यवहारास माझी सक्त हरकत आहे.

वर नमुद मिळकतीबाबत मी दिवाणी व महसुल न्यायालयात दावा/अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे वर नमुद मिळकतीबाबत कोणीही व्यक्तीने, कंपनीने अथवा भागीदारी संस्थेने खरेदीचा करु नये. सदर मिळकतीबाबत कोणीही व्यवहार केल्यास तो माझेवर बंधनकारक राहणार नाही व सदरच्या व्यवहाराविरुध्द मी योग्य ती कायदेशीर कारवाई करीन याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २९.०९.२०२६

सही/-
**सौ. अनुराधा श्यामकांत घरत**
रा. नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड

# दुष्काळी मदतीला 'ई-केवायसी'चा खोडा

- रोह्यात महसूल विभाग नापास
- १,६५२ शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत
- सर्व्हर डाऊनच्या सबबीने महिनोमहिने हेलपाटे; शेतकरी संघटना आक्रमक

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने जाहीर केलेली दुष्काळी मदत कागदोपत्री मंजूर असली, तरी ई-केवायसीच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यापर्यंत ती पोहोचलेली नाही. पंचनामे झाले, कागदपत्रांची पूर्तता झाली; मात्र ई-केवायसी प्रलंबित असल्याने शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. त्यात वारंवार सर्व्हर डाऊन होण्याच्या प्रकारामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रोहा तालुक्यात तब्बल १ हजार ६५२ शेतकऱ्यांची ई-केवायसी अद्याप प्रलंबित असल्याची आकडेवारी समोर आली असून, शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध आता फुटण्याच्या मार्गावर आहे.

अधिकृत आकडेवारीनुसार, रायगड जिल्ह्यात २०२६च्या दुष्काळी मदतीसाठी २१ हजार १९ शेतकऱ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. त्यामुळे पात्र असूनही संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा झालेली नाही. रोहा तालुक्यातही हीच परिस्थिती असून, डिसेंबर २०२५ ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील शासन निर्णयानुसार मदतीस पात्र असलेल्या ८१५ शेतकऱ्यांनाही अद्याप मदतीची प्रतीक्षा करावी लागत आहे.




ई-केवायसीसाठी शेतकऱ्यांना तलाठी कार्यालयांच्या वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. मात्र, सर्व्हर डाऊन असल्याने अनेकदा प्रक्रिया पूर्ण होत नसल्याची तक्रार आहे. महिनोमहिने हीच परिस्थिती कायम राहिल्याने ज्येष्ठ आणि सामान्य शेतकरी त्रस्त झाले आहेत. शेताच्या बांधावर जाऊन पंचनामे करणाऱ्या यंत्रणेला ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करता येत नसेल, तर शेतकऱ्यांनी दाद मागायची कुठे? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

रोहा तालुका मागील दुष्काळी मदतीपासूनही अनेक शेतकरी वंचित असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यात पावसाच्या खंडामुळे मिळणाऱ्या दुष्काळी मदतीच्या यादीतून रोहा तालुक्याला वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत.

### आढावा बैठका कशासाठी?; संघटनांचा प्रशासनाला सवाल

आमदार, खासदार यांच्या आढावा बैठका होऊनही शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ठोस तोडगा निघत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. महसूल विभागाने प्रलंबित ई-केवायसीचा प्रश्न तातडीने सोडवून पात्र शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली आहे. शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत आणि बळीराजा फाऊंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेण्याचा इशारा दिला आहे. प्रलंबित मदत, ई-केवायसी आणि दुष्काळी यादीतून रोहा तालुका वगळण्याच्या मुद्द्यावर लवकरच तहसीलदारांना घेराव घालण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रलंबित ई-केवायसीची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करून ती तातडीने पूर्ण करावी आणि शेतकऱ्यांना त्यांची थकीत मदत मिळावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. त्यामुळे शेतकरी संघटनांचा आक्रमक पवित्रा आणि प्रशासनाची पुढील भूमिका काय राहणार, याकडे रोहा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## निवडक

### नागोठणे शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदी तसव्वूर अधिकार


• (छायाचित्र : महेश पवार)

**नागोठणे :** नागोठणे शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नागोठणे मोहल्ल्यातील युवा कार्यकर्ते तसव्वूर अब्दुल वहाब अधिकारी यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. रोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मितेश ह. कल्याणी यांनी याबाबतचे जारी केलेले अधिकृत नियुक्तीपत्र नुकतेच काँग्रेस पक्षाच्या रोहा येथील एका बैठकीत तसव्वूर अधिकारी यांना नुकतेच देण्यात आले. रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली, तसेच जिल्हा उपाध्यक्ष अशफाक पानसरे, जिल्हा सरचिटणीस सुनील देशमुख आणि जिल्हा कोषाध्यक्ष रामप्रकाश कुशवाहा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली आहे. रोहा येथील हॉटेल मिराज येथे झालेल्या या बैठकीला काँग्रेसचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष अशफाक पानसरे, जिल्हा सरचिटणीस सुनील देशमुख, जिल्हा सरचिटणीस सद्दाम दफेदार, सुनील देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष रामप्रकाश कुशवाहा, ॲड. सुनील सानप, रोहा पंचायत समितीचे माजी सदस्य बिलाल कुरेशी, आसिफ मुल्ला यांच्यासह जिल्हा व तालुक्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विमानतळाभोवती 'ऑफिस स्पेस'ची झुंबड!

**उरण :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवासी सेवेसोबतच कार्गो वाहतुकीला चालना मिळत असल्याने विमानतळाभोवती व्यावसायिक हालचालींना वेग आला आहे. कार्गो, लॉजिस्टिक्स, निर्यात-आयात, सीमाशुल्क आणि मालवाहतूक क्षेत्रातील कंपन्यांकडून कार्यालयांसाठी जागांचा शोध सुरू असल्याने उलवे, पुष्पकनगर आणि द्रोणागिरी परिसरातील व्यावसायिक जागांना आगामी काळात मागणी वाढण्याची शक्यता आहे. विमानतळावर औषधे, नाशवंत व शीतसाखळीतील माल तसेच अवजड माल हाताळण्यासाठी सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. कॅथे कार्गो ने मुंबईतील मालवाहतूक सेवा नवी मुंबई विमानतळावर हलवून हाँगकाँगसाठी आठवड्यातून तीन मालवाहू उड्डाणे सुरू केली आहेत. तसेच फेडएक्सकडून सुमारे तीन लाख चौरस फुटांचे स्वयंचलित मालवाहतूक केंद्र उभारले जात आहे. विमानतळासोबतच जेएनपीए, औद्योगिक क्षेत्रे आणि महामार्गांची जवळीक यामुळे परिसराचे व्यावसायिक महत्त्व वाढत आहे. कार्गो एजंट, ट्रान्सपोर्टर, गोदामे, निर्यात-आयात कंपन्या आणि पूरक व्यवसायांना कार्यालयीन जागांची गरज वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे विमानतळावर विमानांची वर्दळ वाढण्याआधीच उलवे-पुष्पकनगर-द्रोणागिरीच्या व्यावसायिक क्षेत्राला नवे 'टेकऑफ' मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

### सुधागडच्या ठाणाळेत उद्धवसेनेला बळ



**पाली/बेणसे :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सुधागड तालुक्यातील संघटनात्मक बांधणीला ठाणाळे गावातून बळ मिळाले आहे. असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये प्रवेश केला. शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या आदेशाने तालुका प्रमुख नंदू सुतार, उपतालुका प्रमुख किशोर दिघे यांच्या मार्गदर्शनाने आणी किशोर पवार यांची सुधागड तालुक्यात चालू असलेली समाजसेवा व पक्ष बांधणी आणि निडर नेतृत्वावर विश्वास ठेवून शाखा प्रमुख चंद्रकांत फाटे विभाग संघटिका नांदगाव विभाग साधना फाटे यांच्या उपस्थितीत ठाणाळे गावातून कार्यकर्त्यांनी पक्षप्रवेश केला. जनतेच्या दैनंदिन अडीअडचणी, स्थानिक विकासाचे प्रश्न, मूलभूत सुविधा, रोजगार, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे. पदापेक्षा जनतेशी असलेला संपर्क आणि त्यांच्या प्रश्नांसाठी केलेले काम महत्त्वाचे आहे, असा निर्धार किशोर पवार यांनी व्यक्त केला. दरम्यान, या पक्षप्रवेशामुळे ठाणाळे परिसरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संघटनेला नवचैतन्य मिळाल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## सारडे जिल्हा परिषद शाळेला संगणक भेट

| उरण | प्रतिनिधी |



आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही संगणक व माहिती-तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळावे आणि त्यांना शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाऊनटाऊन यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषद शाळा, सारडे येथे संगणक भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची नवी दिशा मिळणार असून, विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन इन्नर व्हील क्लब ऑफ बॉम्बे डाऊनटाऊनच्या अध्यक्षा हेतल खोना, सचिव भारती विक्रमसी तसेच क्लब सदस्य आशिता दावडा व मीनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी क्लबकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमाला आकाश फाउंडेशन मुंबईच्या सचिव संजीवनी शृंगारे, सारडे ग्रामपंचायतीचे सरपंच रोशन पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका समृद्धी वऱ्हाडी, शिक्षिका अपूर्वा घरत, रश्मी पवार, वनिता पाटील, सारडे विकास मंचचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, कृषी मित्र प्रकाश माळी, हॉटेल एमडीएसचे मालक नितीन म्हात्रे, साई कृपा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे जयेश म्हात्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनायक म्हात्रे, उपाध्यक्ष उज्वला पाटील, सदस्या पूनम पाटील, कविता म्हात्रे, मंगेश पाटील, मदतनीस ज्योत्स्ना पाटील तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रामकुमार गुप्ता उत्तरकाशीत बेपत्ता

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील डीकसळ येथील 'पूजा स्वीट्स'चे मालक सुमित गुप्ता यांचे वडील रामकुमार हनुमान गुप्ता (६५) हे उत्तरकाशी येथील गंगोत्री-गोमुख परिसरात देवदर्शनासाठी गेले असता बेपत्ता झाले आहेत.



२५ सप्टेंबर रोजी गंगोत्री-गोमुख ट्रेक मार्गावरील चिरबासाच्या पुढे 'कच्छिधांग' परिसरात ते सुमारे १३० मीटर खोल दरीत पडल्याची माहिती आहे. रामकुमार गुप्ता हे पाच जणांच्या गटासोबत गोमुखच्या दिशेने जात होते. बेपत्ता गुप्तांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.



## संविधान बदलण्याचा प्रयत्न केला तर त्याची वाट लावू

- रामदास आठवले यांचा इशारा
- पालीत मंत्रीपदाच्या दशकपूर्तीनिमित्त भव्य सत्कार

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान कोणी बदलण्याचा प्रयत्न केला तर त्याची वाट लावून टाकू, असा इशारा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइं (आठवले)चे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी रविवारी पाली येथे दिला. मंत्रीपदाच्या दशकपूर्तीनिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया सर्व जाती-धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन काम करणारा पक्ष असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम पक्ष करीत असल्याचे आठवले यांनी सांगितले. तुमचं गाव आहे पाली, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपले वाली,' असेही त्यांनी यावेळी म्हटले.

रिपाइं (आठवले), सुधागड तालुक्याच्या वतीने पालीतील लिमये हॉलमध्ये रविवारी हा सत्कार सोहळा झाला. यानिमित्त पाली शहरातून ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. आठवले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे अभिवादन केले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.

कार्यक्रमाला सीमा आठवले, अविनाश महातेकर, राजाभाऊ सरोदे, गौतम सोनावणे, प्रकाश मोरे, नरेंद्र गायकवाड, राहुल सोनावळे यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी राहुल सोनावळे आणि भावेश गायकवाड यांनी यशस्वीपूर्ण सांभाळली.

### सायबर क्राईम जनजागृतीसह

## आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा उत्साहात

| महाड | प्रतिनिधी |


• (छायाचित्र : जुनेद तांबोळी)

रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे 'सायबर क्राईम अँड सायबर सिक्युरिटी' या विषयावर जनजागृतीपर व्याख्यान तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी सायबर गुन्ह्यांपासून सावध राहावे आणि शिक्षकांच्या कार्याचा गौरव व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सायबर क्राईम अँड सायबर सिक्युरिटी एक्सपर्ट तथा माणगावचे ॲडव्होकेट रोशन पांढरे आणि महाडचे प्रदीप काळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, संशयास्पद लिंक, अनोळखी कॉल तसेच ओटीपी, पीन, पासवर्ड व बँकिंग माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या स्मिता पवार, अनंत गायकवाड आणि प्रतिभा उपाध्ये यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार सोहळ्याचे नियोजन रोटेरियन डॉ. ऋतुजा गावडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ महाडचे अध्यक्ष रोटेरियन राजीव वनारसे, प्रोजेक्ट चेअरमन रोटेरियन सुधीर मांडवकर आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन डॉ. राहुल सुकाळे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सुधीर मांडवकर यांनी केले, तर आभार ट्रेझरर रोटेरियन दीपक शिंदे यांनी मानले.

यावेळी रोटेरियन नितीन जोशी, जगदीश भानूशाली, सचिन सुकाळे, अरुण गावडे, द्वारकानाथ गुरव, सुनील अग्रवाल, मनोज पैलकर, निहार शेठ, अभिषेक सुकाळे, मनोज शेठ, संतोष ग्रामोपाध्ये यांच्यासह रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### 'हातरिक्षा चालकांचे ई-रिक्षाने पुनर्वसन करा'

| माथेरान | प्रतिनिधी |

माथेरानमधील हातरिक्षांची प्रथा बंद करून संबंधित चालकांचे ई-रिक्षाद्वारे तातडीने पुनर्वसन करावे, अशी मागणी कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी रायगड जिल्हाधिकारी तथा सनियंत्रण समितीच्या मानद सचिवांकडे पत्राद्वारे केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑगस्ट २०२५ रोजी माथेरानमधील हातरिक्षा सहा महिन्यांत बंद करून चालकांचे ई-रिक्षाद्वारे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले होते. मात्र, आदेशाला वर्ष उलटूनही हातरिक्षा सुरू असल्याने श्रमिक रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार म्हात्रे यांची भेट घेऊन प्रश्न मांडला.

दरम्यान, पायलट प्रोजेक्ट अंतर्गत ई-रिक्षांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. माथेरानहून कर्जत व कल्याण येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दस्तुरी नाका ते टॅक्सी स्टँडपर्यंत चार-पाच किलोमीटर पायी जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ई-रिक्षांची संख्या तातडीने वाढवावी, अशी मागणीही म्हात्रे यांनी केली. यावेळी प्रकाश सुतार, सुनील शिंदे, सचिन दाभेकर, अनिता रांजाणे, अनिल घोणे, रमेश सकपाळ, झहूर चिपाडे, चंद्रकांत चावरे आणि भरत कारंडे उपस्थित होते.

## उकडीचे मोदक स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### सुरेखा बिराजदार प्रथम, वैशाली मलबारी द्वितीय क्रमांकाच्या मानकरी

| पेण | प्रतिनिधी |



गणरायाच्या आगमनाने घराघरांत दरवळणारा उकडीच्या मोदकांचा सुगंध आणि महिलांच्या पाककलेतील सर्जनशीलतेचा सुरेख मिलाफ पेणमध्ये अनुभवायला मिळाला. महिलांच्या पाककला कौशल्याला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ पेणतर्फे आयोजित करण्यात आलेल्या उकडीचे मोदक स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत सुरेखा बिराजदार यांनी प्रथम, तर वैशाली मलबारी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

स्पर्धेच्या परीक्षक म्हणून पनवेलच्या प्रसिद्ध पाककला तज्ज्ञ संध्या कल्याणकर यांनी काम पाहिले. त्यांनी स्पर्धकांना उकडीचे मोदक बनविताना घ्यावयाची काळजी, उकडीची योग्य पद्धत, सारणाची चव आणि मोदकाच्या कलात्मक बांधणीबाबत मार्गदर्शन केले.

स्पर्धेत सुरेखा बिराजदार यांनी प्रथम, वैशाली मलबारी यांनी द्वितीय, तर मयुरी गोडीवले यांनी तृतीय क्रमांक पटकावला. पूनम पाटील, अर्चना पाटील आणि शीतल खाडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन त्यांच्या कलागुणांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला नगरसेविका पल्लवी कालेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्पर्धक महिलांचे कौतुक करून त्यांच्या पाककला कौशल्याला शुभेच्छा दिल्या. पाककला कौशल्याला व्यासपीठ मिळावे, यासाठी इनरव्हील क्लबतर्फे अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते, असे क्लबच्या अध्यक्षा संयोगिता टेमघरे यांनी सांगितले. कार्यक्रमाला रुची महालकर, सोनाली पाटील, सुषमा तेलंगे, नीलिमा पाटील, भावना पगारे, दीपिका शिगवण, प्रियांका राजे, प्रियांकी मुखर्जी, आलीना सय्यद यांच्यासह क्लबच्या सदस्यांची उपस्थिती होती.

### २५० ते ३०० परदेशी भक्तांनी घेतले दर्शन | मनोज मोरे यांचा थाई भाषेतून अस्खलित संवाद

## थायलंडचे भक्त बल्लाळेश्वराचरणी लीन

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही थायलंड येथील गणेशभक्तांचा उत्साह ओसंडून वाहात आहे. अनंत चतुर्दशीच्या सांगतेनंतर दरवर्षी मुंबईतील गणेशोत्सव अनुभवून पालीमध्ये येणाऱ्या या परदेशी भक्तांची बल्लाळेश्वर चरणी असलेली अथांग भक्ती संपूर्ण परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या प्रवासात तब्बल २५० ते ३०० थायलंडवासियांनी बल्लाळेश्वराचे भाविकतेने दर्शन घेतले असून, सोमवारी (दि. २८) देखील थाई भाविकांचा मोठा समूह पालीत दाखल झाला.



• (छायाचित्र : धम्मशील सावंत)

परदेशातून आलेल्या या गणेश भक्तांशी संवाद साधताना भाषेचा अडसर पूर्णपणे दूर झाला तो स्थानिक व्यावसायिक मनोज मोरे यांच्यामुळे. मनोज मोरे यांनी थायलंडच्या भक्तांशी थेट त्यांच्या मातृभाषेत म्हणजेच 'थाई' भाषेत अस्खलितपणे साधलेला संवाद पाहून उपस्थित सर्वच स्थानिक व भाविक अचंबित झाले.

थायलंड येथील मास्टर बेस्ट या ग्रुपच्या माध्यमातून दरवर्षी शेकडो गणेशभक्त भारताच्या दौऱ्यावर येतात. या परदेशी पाहुण्यांना येथील धार्मिक परंपरा, बल्लाळेश्वराचे महात्म्य आणि स्थानिक संस्कृती मनोज मोरे अत्यंत सोप्या भाषेत समजावून सांगत आहेत. आपल्याच भाषेत मार्गदर्शन मिळत असल्याने थायलंडचे भाविक अत्यंत आनंदी आणि भारावून गेले आहेत. मनोज मोरे यांच्या या संवादाचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. या सांस्कृतिक देवाणघेवाणीतून दोन्ही देशांतील धार्मिक व आंतरराष्ट्रीय पर्यटनाला मोठी उभारी मिळत आहे.

### 'एटीएम'मध्ये छेडछाड

**नवीन पनवेल :** एटीएमच्या या स्लॉटमध्ये पत्र्याची पट्टी बसवल्या प्रकरणी आरोपी अकीब मोहम्मद इरसाद खान (रा. ओबोरा बिल्डिंग, तळोजा फेस वन, सेक्टर ११) तळोजा पोलीस ठाण्यात २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. अकीब मोहम्मद इरसाद खान याने २३ सप्टेंबर रोजी रात्री बाराच्या सुमारास तळोजा सेक्टर ११ येथील एटीएम सेंटरमध्ये प्रवेश केला आणि एटीएममधून ग्राहकांकडून काढण्यात येणारी रोख रक्कम कॅश डिस्पेन्सिंग स्लॉटमध्ये अडकवून ठेवण्याच्या आणि ती रक्कम ग्राहकाला न मिळाल्यानंतर स्वतः घेण्याच्या उद्देशाने त्याने पत्र्याची पट्टी बसवली.

# ...तर तिघांनाही घालवा

निवडणूक आयोगातील भानगडींमुळे मुख्य आयुक्त ज्ञानेशकुमार यांना घालवण्याची मागणी पेटली आहे. इंडिया आघाडीची बैठक होत आहे. सीजेपी दोन ऑक्टोबरपासून मुंबईत आंदोलन सुरू करणार आहे. तर उध्दव आणि राज ठाकरे चार ऑक्टोबरला मोर्चा काढणार आहेत. नीट पेपरफुटीनंतरची ही अशी दुसरी भानगड आहे की ज्यात म्हटले तर भाजपचा थेट संबंध नाही. पण तरीही भाजपवाले या कथित भानगडी करणाऱ्यांच्या पाठीशी उभे आहेत. नीटची परीक्षा लेखी नव्हे तर ऑनलाईन घ्यावी अशी सूचना भाजपच्या मंत्र्यांनी फेटाळली होती व त्यानंतर पेपर फुटल्याचे उघड झाले होते. निवडणूक आयोगाच्या प्रकरणात तर एसआयआर नावाने जी काही मतदारयाद्यांची तपासणी चालू आहे ती निव्वळ भाजपचा फायदा करून देण्यासाठी आहे हे स्पष्ट झाले आहे. देशभरात आतापर्यंत एकूण १३ कोटी मतदारांची नावे यादीतून काढून टाकण्यात आली आहेत. बंगालमध्ये यादीतून वेचून वेचून नावे वगळली गेली. या वगळलेल्यांना त्याविरुध्द अपील करण्यासाठी वेळच उरणार नाही अशी व्यवस्था केली गेली. त्यातूनही ज्यांनी अपील केले व ते मान्य झाले तरीही त्यांची नावे समाविष्ट झाली नाहीत. थोडक्यात काहीही करून भाजपला जिंकवून देण्यासाठी हे कारस्थान रचले गेले. यामागे मुख्य आयुक्त ज्ञानेश कुमार आहेत असे आतापर्यंतच्या बातम्यांवरून दिसत होते. या ज्ञानेशांच्या निर्णयांना अन्य दोन आयुक्तांनी गेल्या दहा महिन्यात चौदा वेळा आक्षेप घेतले व काही निर्णय सरळसरळ बेकायदा आहेत असे म्हटले. तरीही ज्ञानेशांनी आपले निर्णय पुढे रेटले. त्यामुळे ते मुख्य खलनायक असल्याचे समोर आले. पण हा केवळ आयोगातील मतभिन्नतेचा प्रकार होता, बाकी सर्व कायद्यानुसार आहे असे दाखवण्याचा प्रयत्न आता आयोगाने सुरू केला आहे. त्यानुसार शनिवारी तीनही आयुक्तांची एक बैठक घेण्यात आली व तिच्यात सर्वसमंतीने पूर्वीच्या निर्णयांमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या. या बैठकीनंतर एका प्रवक्त्याने आता यावर जणू पडदा पडला आहे अशा रीतीने निवेदन करण्याचा प्रयत्न केला. असे झाल्यामुळे आता ज्ञानेश यांच्यासोबत अन्य आयुक्तांच्या कामाबद्दलही शंका निर्माण झाल्या आहेत.

## बेकायदेशीरपणाला मान्यता?

इंडियन एक्सप्रेसने आयोगातील ज्या भानगडींना वाचा फोडली त्यांच्या बातमीवर आयोगाच्या शनिवारच्या पत्रकार परिषदेने एका अर्थाने शिक्कामोर्तब झाले. ज्ञानेशकुमार हुकुमशाही पध्दतीने कारभार करतात हा त्या बातम्यांमधला महत्वाचा किंवा एकमेव मुद्दा नव्हता. ते बेकायदा निर्णय घेतात व विवेक जोशी व सुखबीरसिंग संधू यांनी वेळोवेळी या कायदे वा नियमभंग दाखवून दिला आहे हे त्या बातम्यांचे मर्म होते. गोव्यातील ९७ मतदारांची दोनदा तपासणी झाली. अपिलातील सुनावणीमध्ये या मतदारांनी आवश्यक ती कागदपत्रे सादर केली. त्यानंतर स्थानिक निवडणूक अधिकाऱ्याने या नागरिकांना मतदारयादीत पुन्हा समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला. एक जबाबदार अधिकारी म्हणून तसे करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे, नव्हे, ती त्यांचीच जबाबदारी आहे. पण इसीआय नेट या एपमध्ये अशी काही पाचर मारून ठेवण्यात आली आहे की असे नावांचे बदल दिल्लीतील आयटीची टीमच करू शकते. ही टीम अर्थातच ज्ञानेश व पर्यायानेभाजपच्या इशाऱ्यावर काम करत असावी असा संशय आहे. खालच्या अधिकाऱ्याला नाकारून दिल्लीतील आयटीच्या टीमकडे असे अधिकार देणे हे बेकायदा असल्याचे संधू व जोशी यांनी सांगितले. त्याची तपासणी करू असे आयोगाने आता म्हटले आहे. निव्वळ इतक्यानेच संधू व जोशी यांचे समाधान झाले असेल तर त्यांच्या नेकी व प्रामाणिकपणावर शंका येणे क्रमप्राप्त आहे. दुसरा मुद्दा फॉर्म सहाचा आहे. नवीन मतदाराच्या नोंदणीसाठी हा फॉर्म भरावा लागतो. पूर्वी १८ वर्षे झाली की पत्ता, ओळख आणि जन्मतारीख यांची प्रमाणपत्रे देऊन सहज नोंदणी होत होती. आता मात्र तरुणांच्या आईबापांची नावे गेल्या मतदारयादीत होती का याची तपासणी केली जात आहे. त्यांच्या जन्मतारखांचे पुरावे मागितले जात आहेत. तो तपशील भरल्याखेरीज फॉर्म सहा मान्य केला जात नाही. फॉर्ममध्ये असा प्रश्न नव्याने समाविष्ट करून मतदारांची अशी अडवणूक करणे हे बेकायदा आहे जोशी यांनी म्हटले होते. त्यांच्या आक्षेपानंतरही फॉर्ममधील हा क्लॉज कायम ठेवला गेला आहे. शनिवारच्या बैठकीत जोशी व संधू यांनी ज्ञानेशांना यावरून धारेवर धरायला हवे होते. हा क्लॉज हटवला जायची मागणी करायला हवी होती. तसे झाले नसेल तर आपण ज्याला बेकायदा म्हटले त्यालाच संधू व जोशी यांनी आता मान्यता दिली आहे असा अर्थ होतो.

## आग न विझवणारे कारकून

शनिवारी खरे तर आयोगाच्या तीनही आयुक्तांनी एकत्रित पत्रकार परिषद घ्यायला हवी होती. सर्व प्रश्नांची समोरासमोर उत्तरे द्यायला हवी होती. तसे न होता आयोगाच्या प्रवक्त्याला पुढे केले गेले व सर्व काही एकमताने उत्तम चालू आहे असा देखावा निर्माण केला गेला. याला संधू व जोशी यांनी अप्रत्यक्षपणे अनुमती दिली आहे असेच म्हणावे लागेल. तसे असेल तर ज्ञानेशकुमार यांच्याप्रमाणेच या अन्य दोघांकडूनही फारशा अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही. किंबहुना आता फक्त ज्ञानेशच नव्हे तर या दोन्ही आयुक्तांच्या देखील राजीनाम्याची मागणी विरोधकांना करावी लागेल. मुळात गेले वर्षभर बेकायदा गोष्टी घडत असताना केवळ कागदावर आपला निषेध नोंदवून संधू व जोशी यांनी आपली चाकरी चालू ठेवली असेल तर तोच मोठा गुन्हा आहे. निवडणूक आयुक्त हे घटनात्मक पद आहे. त्यांच्या हातात खूप मोठी शक्ती आहे व लोकशाहीमध्ये त्यांच्यावर मोठी जबाबदारीही आहे. पण संधू आणि जोशी यांनी गेल्या वर्षभरात ती पूर्णांशाने पार पाडली नाही. आता किमान ज्ञानेश कुमार यांची हुकुमशाही उघड झाल्यानंतर तर त्यांनी खुलेपणाने यावर बोलायला हवे होते किंवा निदान परवाच्या बैठकीत स्पष्ट भूमिका घ्यायला हवी होती. पण तोंडदेखला निषेध करून ते पदाला चिकटूनच राहत असतील तर ते ज्ञानेश कुमार यांच्याहूनही अधिक आक्षेपार्ह वागत आहेत असे म्हणावे लागेल. त्यांच्या पदावर राहण्याने जनतेचे अधिक नुकसान होणार आहे. आग लागली तर ती न विझवता नुसती तिची कागदोपत्री नोंद करून ठेवणारे असले कारकून लोकशाहीच्या उपयोगाचे नाहीत. या प्रश्नावर महाराष्ट्रात अजून म्हणावी तशी जागृती झालेली नाही. तूर्तास लगेचच निवडणुका नसल्याने लोक गाफील आहेत. मतदार म्हणूनच्या कागदपत्रात त्रुटी असल्याच्या नोटिसा काढल्याचे आयोग म्हणत असला तरी असंख्य मतदारांना या नोटिसा मिळालेल्या नाहीत. परवा दिल्लीत खुद्द कपिल सिब्बल यांनीही आपल्याला नोटीस निघाली असल्याचे बाहेरून कळले हे पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे राजकीय पक्षांनी याबाबत वेळीच सजग होऊन आपापल्या मतदारांची काळजी घेणे आवश्यक आहे. शिवाय आयोग साफ करण्यासाठी आंदोलनाचा रेटा लावण्याचीही गरज आहे.

---

विचार

# 'मेंटेन इन इंडिया'ची झेप!

*भारतीय विमान कंपन्यांना अनेकदा सिंगापूर, दुबई, मलेशिया किंवा श्रीलंकेतील 'एमआरओ' केंद्रांमध्ये विमाने पाठवावी लागत होती. त्यासाठी मोठा खर्च होत होताच; पण विमाने सेवेत रहात नसल्याने कंपन्यांचे आर्थिक नुकसानही होत होते. विमान उद्योगात प्रत्येक तास महत्त्वाचा असतो. विमान जमिनीवर उभे राहिल्यास उत्पन्न न मिळून देखभालीसाठी लागणारा वेळ आणि खर्च दोन्ही कमी करणे आवश्यक असते.*

**प्रा.सुखदेव बखळे**

भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्र गेल्या दशकात अभूतपूर्व वेगाने वाढले आहे. प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत आहे. नवीन विमानतळ उभारली जात आहेत. प्रादेशिक हवाई संपर्काला चालना मिळत आहे आणि भारतीय विमान कंपन्या अनेक नवीन विमानांची ऑर्डर देत आहेत. जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या विमान बाजारपेठांमध्ये भारताची गणना होत असताना, या क्षेत्रातील एक मोठी विसंगती मात्र कायम आहे. भारतीय विमाने देशात उड्डाण करत असली, तरी त्यांच्या देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉलसाठी (मेंटेनन्स, रिपेअर अँड ओव्हरहॉल) परदेशातील केंद्रांवर अवलंबून रहावे लागत होते. यामुळे दरवर्षी हजारो कोटी रुपयांचे परकीय चलन देशाबाहेर जात होते. आता केंद्र सरकारने 'एमआरओ' क्षेत्रासाठी केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे भारत या परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहे. हा प्रयत्न यशस्वी झाला, तर भारत केवळ मोठी विमान बाजारपेठ राहणार नाही, तर विमान देखभालीचे जागतिक केंद्र म्हणूनही उदयास येऊ शकतो. विमान उद्योगात 'एमआरओ' हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र मानले जाते. प्रत्येक विमानाला ठराविक कालावधीनंतर तांत्रिक तपासणी, इंजिन ओव्हरहॉल, सुटे भाग बदलणे आणि सुरक्षेच्या दृष्टीने अनेक प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. या प्रक्रियेशिवाय कोणतेही विमान उड्डाण करू शकत नाही. त्यामुळे 'एमआरओ' उद्योग हा विमान वाहतुकीचा कणा मानला जातो; परंतु भारतात या क्षेत्राचा अपेक्षित विकास झाला नाही. यामागे कररचना, धोरणातील विसंगती, पायाभूत सुविधांचा अभाव आणि परदेशी केंद्रांशी स्पर्धा करण्यासाठी आवश्यक अनुकूल व्यवस्था नसणे ही प्रमुख कारणे होती. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने एमआरओ क्षेत्राला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

आपल्याकडे 'एमआरओ' सेवांवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला. त्याचबरोबर पूर्ण 'इनपुट टॅक्स क्रेडिट'ची सुविधा देण्यात आली. विमानांचे सुटे भाग आणि इंजिनवरील 'आयजीएसटी' कमी करण्यात आला. काही महत्त्वाच्या विमानघटकांवरील मूलभूत सीमाशुल्कही शून्य करण्यात आले. मूळ परदेशी उपकरण उत्पादक कंपन्यांनी भारतीय 'एमआरओ' कंपन्यांकडे दिलेले काम निर्यात म्हणून मान्य करण्यात आले. या सर्व निर्णयांमुळे भारतीय कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करणे अधिक सोपे होणार आहे. सरकारने केवळ करसवलती दिल्या नाहीत, तर पायाभूत सुविधांवरही भर दिला आहे. विमानतळ प्राधिकरणाच्या विमानतळांवर 'एमआरओ' केंद्रांसाठी जमीनवाटपाची प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यात आली आहे.

भाडेपट्ट्याचा कालावधी वाढवण्यात आला आहे. नवीन हँगर उभारणाऱ्या कंपन्यांना प्रारंभीचा भाडेमुक्त कालावधी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा सुविधा भांडवली गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. कारण विमान देखभाल केंद्र उभारण्यासाठी अत्याधुनिक हँगर, उपकरणे आणि प्रशिक्षित मनुष्यबळावर मोठी गुंतवणूक करावी लागते. या सुधारणांचे परिणामही दिसू लागले आहेत. फ्रान्समधील जागतिक विमान इंजिन उत्पादक कंपनी सफ्रानने हैदराबाद येथे सुमारे १,३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून अत्याधुनिक विमान इंजिन एमआरओ केंद्र उभारले आहे. हा प्रकल्प भारताच्या क्षमतेवर जागतिक उद्योगाचा वाढता विश्वास दर्शवतो.

अशा प्रकारच्या गुंतवणुकीमुळे इतर बहुराष्ट्रीय कंपन्याही भारताकडे आकर्षित होऊ शकतात. भारतात एअरबस, बोईंग, जीई एरोस्पेस, रोल्स-रॉइस आणि प्रॅट अँड व्हिटनी यांसारख्या कंपन्यांनीही दीर्घकालीन गुंतवणूक केल्यास भारताकडे आशियातील प्रमुख 'एमआरओ' केंद्र बनण्याची क्षमता आहे. भारताकडे या क्षेत्रासाठी अनेक नैसर्गिक फायदे आहेत. देशाचे भौगोलिक स्थान आशिया, मध्यपूर्व आणि आफ्रिकेला जोडणारे आहे. मोठी देशांतर्गत विमान बाजारपेठ, वाढणारी विमानांची संख्या, तुलनेने कमी मनुष्यबळ खर्च आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील मजबूत कौशल्य ही भारताची जमेची बाजू आहे. या सर्वांचा योग्य वापर झाला, तर भारत केवळ स्वतःच्या विमानांचीच नव्हे, तर इतर देशांमधील विमानांचीही देखभाल करू शकतो; मात्र ही संधी साधण्यासाठी केवळ धोरणात्मक सवलती पुरेशा ठरणार नाहीत. सर्वात मोठे आव्हान म्हणजे कुशल मनुष्यबळाची उपलब्धता. 'एमआरओ' उद्योगात विमान देखभाल अभियंते, एव्हिऑनिक्स तज्ज्ञ, इंजिन विशेषज्ञ, संरचना अभियंते आणि अत्याधुनिक उपकरणे हाताळणारे प्रशिक्षित तंत्रज्ञ आवश्यक असतात. आज भारतात अशा कौशल्यांची कमतरता आहे. त्यामुळे अभियांत्रिकी महाविद्यालये, आयटीआय, विमान प्रशिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात अधिक समन्वय निर्माण करणे आवश्यक आहे. जागतिक दर्जाच्या प्रशिक्षणाला प्राधान्य दिल्याशिवाय भारताला या क्षेत्रात नेतृत्व मिळवणे कठीण जाईल. संशोधन आणि विकास हेही तितकेच महत्त्वाचे क्षेत्र आहे.

आज 'एमआरओ' उद्योग कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, डिजिटल ट्विन तंत्रज्ञान, रोबोटिक्स आणि प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्सकडे वेगाने वाटचाल करत आहे. भविष्यात विमानांच्या सेन्सरमधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे बिघाड होण्यापूर्वीच दुरुस्ती केली जाईल. या अत्याधुनिक तंत्रज्ञानात गुंतवणूक न केल्यास भारत केवळ स्वस्त मजुरी देणारा देश राहील. उलट, संशोधनावर भर दिल्यास भारत उच्च मूल्यवर्धित सेवा देणारा जागतिक भागीदार बनू शकतो. नियामक प्रक्रियेतही सुधारणा आवश्यक आहेत. विमान उद्योगात सुरक्षा ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक 'एमआरओ' केंद्राला आंतरराष्ट्रीय मानके पूर्ण करावी लागतात. परवानग्या, प्रमाणपत्रे आणि नियामक मंजुरी वेळेत मिळाल्या नाहीत, तर उद्योगाचा वेग मंदावतो. त्यामुळे नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) जागतिक सर्वोत्तम पद्धती स्वीकारून प्रक्रिया अधिक सुलभ करणे आवश्यक आहे. जागतिक स्पर्धाही कमी नाही. सिंगापूर, दुबई, मलेशिया आणि तुर्की यांसारख्या देशांनी गेल्या अनेक वर्षांमध्ये 'एमआरओ' क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली आहे.

उत्कृष्ट पायाभूत सुविधा, वेगवान सेवा आणि जागतिक दर्जाचे कौशल्य यांच्या जोरावर त्यांनी मोठ्या बाजारपेठेवर कब्जा केला आहे. भारताला या देशांशी स्पर्धा करायची असेल, तर खर्च कमी ठेवण्याबरोबरच गुणवत्ता, वेळेचे नियोजन आणि विश्वासार्हता यांवरही भर द्यावा लागेल.

या क्षेत्राचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे रोजगारनिर्मिती. 'एमआरओ' उद्योगात निर्माण होणारे रोजगार हे उच्च कौशल्याधारित आणि चांगल्या वेतनाचे असतात. एक मोठे 'एमआरओ' केंद्र हजारो थेट आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करू शकते. त्याचबरोबर सुटे भाग, विशेष उपकरणे, लॉजिस्टिक्स, माहिती तंत्रज्ञान, प्रशिक्षण आणि अभियांत्रिकी सेवा अशा अनेक पूरक उद्योगांनाही चालना मिळते. त्यामुळे हा उद्योग केवळ विमान कंपन्यांसाठी नव्हे, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचा ठरतो. भारताच्या संरक्षण क्षेत्रालाही याचा मोठा फायदा होऊ शकतो. नागरी आणि संरक्षण क्षेत्रातील अनेक तांत्रिक कौशल्ये समान असतात. मजबूत 'एमआरओ' परिसंस्था तयार झाल्यास लष्करी विमानांची देखभाल, स्वदेशी उत्पादन आणि संरक्षण उद्योगालाही चालना मिळू शकते. 'आत्मनिर्भर भारत' अभियानाच्या दृष्टीनेही हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. पुढील दोन दशकांमध्ये जगभरात हजारो नवीन विमानांची भर पडणार आहे. भारतातील विमान कंपन्यांनीही मोठ्या प्रमाणावर विमानखरेदीची घोषणा केली आहे. म्हणजेच 'एमआरओ' सेवांची मागणी सातत्याने वाढणार आहे. हा वाढता बाजार भारतासाठी मोठी आर्थिक संधी घेऊन आला आहे. आज योग्य धोरणे, पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळ उभारले, तर पुढील काही वर्षांमध्ये भारत जागतिक 'एमआरओ' नकाशावर महत्त्वाचे स्थान मिळवू शकतो. एकूणच, केंद्र सरकारने केलेल्या सुधारणांनी योग्य दिशा दाखवली आहे; मात्र करसवलती आणि धोरणात्मक घोषणा यापलीकडे जाऊन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

उद्योग, सरकार, शैक्षणिक संस्था आणि संशोधन क्षेत्र यांच्यामध्ये मजबूत समन्वय निर्माण झाला, तर भारताला या क्षेत्रात मोठी झेप घेता येईल. आज भारतासमोर केवळ विमाने उडवण्याचे नव्हे, तर जगातील विमान उद्योगाला सेवा पुरवण्याचे स्वप्न आहे. 'मेक इन इंडिया'नंतर आता 'मेंटेन इन इंडिया' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ आली आहे. भारताने ही संधी ओळखून दीर्घकालीन दृष्टिकोन स्वीकारला, तर विमान देखभाल उद्योग देशाच्या आर्थिक विकासातील नवे इंजिन ठरू शकतो. अशा वेळी भारत हा केवळ जगातील मोठी विमान बाजारपेठ म्हणून नव्हे, तर जागतिक विमान उद्योगाचा विश्वासार्ह तांत्रिक भागीदार म्हणूनही ओळखला जाईल.

---

चर्चा आजची

# अलिबाग स्थानकाला सुविधांची प्रतीक्षा



**प्रमोद जाधव**

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या अलिबाग स्थानकात सुविधांचा प्रचंड अभाव निर्माण झाला आहे. कंत्राटी स्वरुपात असलेल्या स्वच्छता विभागाचा कारभार स्तुस्त असून, ठिकठिकाणी कचऱ्याचा ढिगारा पडलेला आहे. अनेक भागात गवत व सखल भागात पाणी साचलेले आहे. स्वच्छतेमध्ये तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या अलिबाग एसटी बसस्थानकांची स्वच्छता कागदावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानकाच्या परिसरात ठिकठिकाणी कचऱ्यासह गवताचे साम्राज्य निर्माण झाले आहे. स्वच्छतागृह बंद स्थितीत असून, त्या परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्वच्छतेसाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदारांचे कामकाज संशयास्पद असल्याची चर्चा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. अलिबाग स्थानकाला सुविधांची प्रतीक्षा लागून राहिली असून, याबाबत एसटी महामंडळ अलिबाग स्थानकाच्या विकासासाठी पुढाकार घेईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या जिल्ह्याच्या ठिकाणी एसटी महामंडळाचे आगार व स्थानक अलिबागमध्ये आहे. अलिबाग आगारात अडीचशेहून अधिक कर्मचारी आहेत. त्यामध्ये दीडशेहून अधिक चालक व वाहकांचा समावेश आहे. स्थानकात ६८ एसटी बस असून, एसटीला महिन्यातून सुमारे पाच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. अलिबाग तालुक्यासह अनेक भागातील हजारो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. वेगवेगळ्या विभागातील जिल्हा व तालुका शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आहेत. नोकरीबरोबरच शिक्षणासाठी अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पर्यटकांची ओघही अलिबागमध्ये प्रचंड आहे. नियमीत कामाला येणारे प्रवासी, पर्यटक, विद्यार्थी एसटी बसमधून प्रवास करणाऱ्यावर अधिक भर देतात.

प्रवाशांना चांगली सुविधा मिळावी म्हणून स्थानकाच्या परिसरात सामाजिक बांधिलकीतून स्वच्छतागृह उभारले आहे. लाखो रुपये खर्च करून हे स्वच्छतागृह मागील काही वर्षांपूर्वी बांधले आहे.स्थानक स्वच्छ व सुंदर दिसावे यासाठी एसटी महामंडळाने एका खासगी कंपनीला ठेका दिला आहे. या कंपनीच्या मार्फत अलिबाग स्थानकाची स्वच्छता राखली जाते. मात्र, स्थानकाच्या आवारातच ठिकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य आहे. स्थानकाच्या आवारात असलेल्या हिरकणी कक्षाच्याबाजूलाच कचऱ्याचा ढिगारा पडलेला असतो. स्थानकामधील स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झाली आहे. स्वच्छतागृहाच्या परिसराला गवत, झुडपांनी विळखा घातला आहे. स्वच्छतागृहातील अनेक साहित्य तुटलेल्या अवस्थेत आहेत. स्वच्छतागृहाच्या बाजूने फिरकणाऱ्यांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. गेली अनेक दिवसांपासून हे स्वच्छतागृह बंद स्थितीत आहे. त्यामुळे त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. अलिबाग स्थानकाच्या परिसरातील कोपऱ्यात गेल्या अनेक वर्षांपासून असलेल्या स्वच्छतागृहात जाणे नकोसे झाले आहे. दुर्गंधीबरोबरच साचलेल्या सांडपाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलिबाग एसटी बस स्थानकातील स्वच्छतागृहामधील अस्वच्छतेबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवासी वर्गाकडून तक्रारी केल्या जात आहेत. मात्र, या तक्रारीचे निराकरण करण्यास आगार व्यवस्थापक उदासीन ठरले आहे. आगार व्यवस्थापकांकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रवासी वर्गाकडून व्यक्त केला जात आहे. अलिबाग एसटी बस आगारात महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात आले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून हे कक्ष बंद स्थितीत आहे. त्यामुळे या हिकरणी कक्षाच्या बाजूला गवत वाढले असून, हे कक्ष वाहन पार्किंगचे केंद्र बनले आहे. आगारात वेगवेगळी सुरक्षा यंत्रणा असतानाही याकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे. एसटीचे कामकाज पारदर्शक व कॅशलेस होण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने स्मार्ट योजना लागू केली आहे. मार्च ते एप्रिलपासून सुरु झालेल्या या योजनेला महिलांसह ज्येष्ठ नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र, अलिबाग स्थानकात असलेल्या या केंद्रात महिलांसह ज्येष्ठ नागरिकांना बसण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे तासन्‌तास या केंद्रासमोर उभे राहण्याची वेळ महिलांसह ज्येष्ठ नागरिकांवर येत आहे. त्यामध्ये स्मार्ट कार्ड नोंदणीसह कार्ड मिळविण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करताना प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. अनेक वेळा सर्व्हर बंद असल्याचे प्रकार घडत आहे. त्यामुळे तासन्‌तास उभ्या असलेल्या लाभार्थ्यांना नोंदणी आणि कार्डअभावी परतीचा मार्ग स्वीकारण्याची वेळ येत आहे. मागील चार दिवसांपूर्वी रांगेत उभ्या असलेल्या तरुणीला चक्कर आली. त्याठिकाणी सुविधांचा अभाव असल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. मात्र, याबाबत आगार व्यवस्थापकांनी गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.

---

लोकसंसद

## पितृपक्ष, मानवी मूल्यांची, कौटुंबिक कृतज्ञतेची शिकवण

सांप्रतच्या आधुनिक काळात पितृपक्षाला श्रद्धेचा केवळ एक विधी न मानता त्याचे धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. धार्मिक दृष्टिकोनातून पितृपक्ष हा आपल्या पूर्वजांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र काळ मानला जातो. आपल्या जन्मदात्या पूर्वजांच्या आत्म्याला शांती लाभावी यासाठी या काळात श्राद्ध आणि दानधर्म केला जातो. आपल्या संस्कृतीत पितृऋण हे देवऋणाइतकेच महत्त्वाचे मानले गेले आहे, कारण ज्या पूर्वजांमुळे आपल्याला हे जीवन, संस्कृती आणि संस्कार मिळाले त्यांच्याप्रती कृतज्ञ राहणे हे आपले परम कर्तव्य आहे. आध्यात्मिक पातळीवर या काळात आपल्या मागे पूर्वज परंपरेचा आशीर्वाद आहे याची जाणीव होऊन मनाला शांतता लाभते. मात्र पितृपक्षाबाबत समाजात काही गैरसमजही आहेत. अनेकजण या काळाला अशुभ मानून नवीन कामांची सुरुवात करणे टाळतात. परंतु शास्त्रानुसार आपल्या पूर्वजांचे स्मरण करण्याचा हा काळ अत्यंत पवित्र असून, तो कधीही अमंगळ असू शकत नाही. कावळा आला नाही तर पितर कोपतात हाही एक चुकीचा समज आहे. खरे तर कावळा हे केवळ निसर्गातील एक माध्यम आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पूर्वज गेल्यानंतर श्राद्ध करण्यापेक्षा माता-पिता हयात असताना त्यांची सेवा करणे हेच खरे श्रेष्ठ कर्तव्य आहे याची जाणीव मनामनात रुजणे गरजेचे आहे. पितृपक्ष ही केवळ एक रूढी नसून ती मानवी मूल्यांची आणि कौटुंबिक कृतज्ञतेची शिकवण आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

---

दिनविशेष

# आपल्या अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

अन्नाला आपल्या संस्कृतीत 'पूर्णब्रह्म' म्हटले जाते. अन्न हे केवळ जगण्यासाठीचे साधन नसून ते शेतकऱ्याच्या कष्टाचे, निसर्गाच्या देणगीचे आणि समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे. म्हणूनच अन्नाची नासाडी करणे म्हणजे केवळ एका पदार्थाची किंवा पैशाची नासाडी नव्हे, तर त्यामागे असलेल्या श्रमांचा आणि नैसर्गिक संसाधनांचा अपमान होय. २९ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अन्नाची नासाडी आणि अपव्ययाबाबत जनजागृती दिन म्हणून पाळला जातो. अन्नाची नासाडी कमी करणे, अन्नसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि उपलब्ध अन्नाचा योग्य वापर करण्याची सवय समाजात रुजवणे, हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे. जगभरात एकीकडे कोट्यवधी लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही, तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते, ही विसंगती निश्चितच चिंताजनक आहे. भारतातही अन्नाच्या अपव्ययाचे प्रमाण मोठे आहे. घरगुती वापर, हॉटेल-रेस्टॉरंट, विवाह समारंभ, विविध सामाजिक कार्यक्रम, बुफे पद्धतीचे भोजन आणि किरकोळ विक्रीच्या साखळीत मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने प्रसिद्ध केलेल्या अहवालांनीही भारतातील अन्नाच्या अपव्ययाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यापुरता मर्यादित न ठेवता, उपलब्ध अन्न वाया जाऊ न देण्याशीही जोडला पाहिजे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी उन्हातान्हात राबतो, पाऊस, दुष्काळ, अवकाळी पाऊस, रोगराई आणि बाजारभावाच्या संकटांचा सामना करतो. शेतातून आपल्या ताटापर्यंत अन्न पोहोचण्यासाठी अनेक हातांचे कष्ट लागतात. अशा परिस्थितीत ताटात वाढलेले अन्न अर्धवट सोडून देणे किंवा उरलेले अन्न निष्काळजीपणे कचरापेटीत फेकून देणे योग्य नाही. एका बाजूला शेतकरी अन्न पिकविण्यासाठी संघर्ष करतो आणि दुसऱ्या बाजूला आपण सहजपणे अन्न फेकून देतो, ही विरोधाभासी परिस्थिती बदलली पाहिजे. आपल्या घरातील ज्येष्ठ मंडळी नेहमी सांगायची 'ताटात घेतलेले अन्न वाया घालवू नका.' 'हवे तेवढेच वाढून घ्या आणि घेतलेले पूर्ण खा' ही साधी शिकवण आजच्या पिढीने पुन्हा आत्मसात करण्याची गरज आहे. लग्नसमारंभ, वाढदिवस, सण-समारंभ आणि हॉटेलमधील भोजनावेळी गरजेपेक्षा अधिक पदार्थ ताटात घेण्याची सवय कमी झाली पाहिजे. 'अधिक म्हणजे चांगल' या मानसिकतेऐवजी 'आवश्यक तेवढेच' हा विचार रुजविला पाहिजे. अन्नाची नासाडी ही केवळ आर्थिक बाब नाही; तिचा पर्यावरणावरही परिणाम होतो. अन्न तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, जमीन, ऊर्जा, वाहतूक आणि मनुष्यबळ लागते. अन्न तयार करून ते खाल्लेच गेले नाही तर या सर्व संसाधनांचा अप्रत्यक्ष अपव्यय होतो. फेकून दिलेले अन्न कचऱ्यात सडताना पर्यावरणासाठी हानिकारक वायू निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अन्न वाचविणे म्हणजे केवळ अन्न वाचविणे नव्हे, तर पाणी, ऊर्जा, जमीन आणि पर्यावरणाचेही संरक्षण करणे होय अन्न वाया जाऊ नये यासाठी घरापासूनच सुरुवात करणे आवश्यक आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने गरजेपुरतेच अन्न वाढून घेणे, उरलेले अन्न योग्य पद्धतीने साठवणे, उपलब्ध अन्नाचा पुनर्वापर करणे आणि खराब होण्यापूर्वी त्याचा उपयोग करणे, या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. हॉटेल आणि रेस्टॉरंटनीही ग्राहकांना आवश्यक तेवढेच अन्न घेण्यास प्रोत्साहन द्यावे. त्याचबरोबर कार्यक्रमांमध्ये उरलेले सुरक्षित आणि खाण्यायोग्य अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, हॉटेल व्यावसायिक आणि नागरिक यांच्या समन्वयातून व्यवस्था उभी करता येऊ शकते. अनेक ठिकाणी उरलेले अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे उपक्रम सुरू आहेत. अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. 'कम्युनिटी किचन' किंवा सामुदायिक अन्नवाटप केंद्रांसारख्या संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविता येतील. मात्र, गरजू व्यक्तींना अन्न देताना त्याची सुरक्षितता, स्वच्छता, साठवणूक आणि वेळेत वितरण यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. 'अन्न हे पूर्णब्रह्म' ही आपली संस्कृतीतील शिकवण केवळ बोलण्यात न राहता ती आपल्या आचरणात उतरली, तर अन्नाच्या अपव्ययाला मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल. अन्नाची नासाडी थांबवूया, अन्नाचा आदर करूया आणि अन्न वाचवून भुकेल्यांच्या जीवनात आशेचा घास देऊया!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२९ सप्टेंबर
१) श्री.सुरेश रामचंद्र म्हात्रे
विद्यानगर, अलिबाग
२९-०९-१९४७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**विश्वनाथ (विलास) निगळ्ये,ठाणे**

**सुमित्रा पद्माकर माळी, प्रथम पुण्यतिथी, अलिबाग**

**कै. शंकर भास्कर म्हात्रे, स्मरणार्थ अलिबाग**

## अमित दळवी यांना पितृशोक

**धाटाव :** रोहा तालुक्यात सुतारवाडी विभातील दुरटोली गावचे विश्वनाथ दळवी यांचे शुक्रवारी (दि.२५) सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे दळवी परिवारासह सबंध सुतारवाडी, धाटाव परिसरात शोककळा पसरली आहे. दळवी हे सुतारवाडीतील दुरटोली गावचे मूळ रहिवासी असून सध्या ते धाटाव येथे कायम वास्तव्यास होते. रायगड जिल्हा कबड्डी असो. चे क्रीडा पंच तसेच क्रीडा संकुल समिती सदस्य अमित दळवी यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, बहीण,पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार ४ ऑक्टोबर तर उत्तरकार्य विधी मंगळवार ६ ऑक्टोबर रोजी दुरटोली येथे करण्यात येणार असल्याचे त्यांच्या नातेवाईकींनी सांगितले आहे.

# प्रदूषित पाण्यामुळे मृत माशांचा खच

## • टेमघर नाल्यातून पिवळसर रंगाचे पाणी • परिसरात तीव्र दुर्गंधीने भीतीचे वातावरण

**| महाड| प्रतिनिधी |**

महाड एमआयडीसीतील टेमघर नाल्यात प्रदूषित पाणी मिसळल्याने असंख्य मासे, जलचर मृत्युमुखी पडल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली आहे. नाल्यात मृत माशांचा अक्षरशः खच पडला असून, वाम, खवल, शिवडा, मळे, दांडणी यांसह विविध जातींच्या लहान-मोठ्या माशांचा यामध्ये समावेश आहे. जिते गावच्या हद्दीतील एमआयडीसी परिसरातील एका औद्योगिक आस्थापनाच्या शेजारील नाल्यातून पिवळसर रंगाचे प्रदूषित पाणी वाहत असून, याच ठिकाणापासून मासे मृत्युमुखी पडण्यास सुरुवात झाल्याचे दिसून आले आहे.



मृत माशांचा हा खच टेमघर गावापासून थेट काळ नदीपर्यंत पसरला आहे. नाल्यात फेसाळयुक्त व लालसर रंगाचे रासायनिक पाणी वाहत असून, परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. दरम्यान, एमआयडीसीच्या मुख्य रस्त्यावरील पुलाखालून देखील रासायनिक सांडपाणी बाहेर पडत असल्याचे निदर्शनास आले असून या ठिकाणी सांडपाणी वाहून नेणारी एखादी वाहिनी फुटली असावी, असा प्राथमिक अंदाज देखील वर्तविण्यात येत आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी भेट देऊन संबंधित नाला तसेच काळ नदीच्या संगम परिसरातील पाण्याचे नमुने संकलित केले असून ते तपासणीसाठी पुढे पाठवले आहेत. टेमघर नाल्यात मोठ्या प्रमाणात मगरींचा वावर असल्याने त्यांच्यासह अन्य जलचरांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेला हा विषारी कारभार रोखणार तरी कोण? असा संतप्त सवाल आता परिसरातील ग्रामस्थ करत आहेत.

### पाण्याचे नमुन तपासणीसाठी

टेमघर नाल्यात मोठ्या प्रमाणावर रासायनिक सांडपाणी मिसळल्यामुळे मोठ्या प्रमाणावर मासे मृत्युमुखी पडले आहेत. सदर नाल्यातील पाण्याचे नमुने, त्याचप्रमाणे या नाल्याच्या काळ नदीपात्रातील संगमाजवळील नमुनेदेखील जमा केले असून, ते तपासणीसाठी पाठवले आहेत.

या घटनेचा महाड शहर विकास मंच या महाडमधील सोशल मीडिया समूहानेही निषेध व्यक्त केला असून महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्याकडे याबाबतीत कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या नाल्यातील प्रदूषण हा नित्याचाच विषय बनला असल्याने वरचेवर होणाऱ्या या घटनेमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले असून निसर्गासह मानवी जीविताशी खेळणाऱ्या अशा दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी आणि भविष्यात अशा पद्धतीच्या घटना घडणार नाहीत यासाठी ठोस उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांसह निसर्गप्रेमी व पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून करण्यात आली आहे. रासायनिक सांडपाण्याबाबत संपूर्ण परिसराचा तपास केला असता वरील डोंगराळ भागातूनच लालसर पाणी खाली येत असल्याचे व नाल्यात मिसळत असल्याचे दिसून येत आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन हे सांडपाणी नाल्यांमध्ये मिसळण्याची शक्यता दिसून येत आहे.

## चौलमध्ये ब्राह्मण समाजातर्फे 'ज्ञानयज्ञ'चे आयोजन

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

चौल येथील ब्राह्मण समाज, चौल यांच्या वतीने सलग तीन दिवस विविध विषयांवरील व्याख्याने आणि पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

'ज्ञानयज्ञ' या उपक्रमाचे यंदा २६ वे वर्ष असून, बुधवार दि. १४ ते शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सुंदर नारायण मंदिर, चौल नाका येथे कार्यक्रम होणार आहेत. बुधवार (दि.१४) ऑक्टोबर रोजी कार्यक्रमाची सुरुवात नवीन म्हात्रे लिखित 'प्राचीन चौल व्यापारी बंदराचा इतिहास' या पुस्तकाच्या प्रकाशनाने होणार आहे. यानंतर डॉ. सचिन जोशी यांचे चौल पुरातत्त्वीय उत्खनन : कारणे, महत्त्व आणि परिणामम या विषयावर व्याख्यान होणार आहे. या दिवसाचा कार्यक्रम सायंकाळी ४ ते ६.३० या वेळेत होईल. चौलच्या ऐतिहासिक, पुरातत्त्वीय, वैज्ञानिक आणि सुरक्षाविषयक बाबींवर नागरिकांना माहिती मिळावी, या उद्देशाने विविध विषयांची निवड करण्यात आली आहे. सुंदर नारायण मंदिर, चौल नाका येथे होणाऱ्या या ज्ञानयज्ञ कार्यक्रमास सर्वांसाठी प्रवेश खुला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक ब्राह्मण समाज, चौल यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ५ ऑक्टोबरला महसूल लोक अदालत

**| माणगाव | प्रतिनिधी |**

■ **नागरिकांच्या समस्यांचे थेट करणार निरसन**

■ **दावे व अपिलांचा जलद निपटारा करण्यावर भर**

महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक प्रकरणे आणि प्रलंबित अपिलांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी माणगाव उपविभागात महात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत माणगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सोमवार, ५ ऑक्टोबर तसेच सोमवार, ७ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष सुनावणी घेण्यात येणार आहे. अशी माहिती उपविभागीय अधिकारी माणगाव यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.

महसूल प्रशासनातील मंडळ अधिकारी, तहसीलदार, अपर तहसीलदार, शेतजमीन न्यायाधिकरण तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक दावे व अपिलांचा जलद निपटारा हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. महसूल विषयक दावे दाखल झाल्यानंतर विविध कारणांमुळे अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. त्यामुळे संबंधित पक्षकारांना वेळ, खर्च आणि न्यायालयीन प्रक्रियेचा अतिरिक्त भार सहन करावा लागतो. तडजोडीने अथवा उभय पक्षांच्या सहमतीने निकाली काढता येणाऱ्या प्रकरणांना या विशेष अभियानाच्या माध्यमातून जलदगतीने निर्णयाच्या टप्प्यावर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अपर जिल्हाधिकारी यांनी माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी महसूल लोक अदालत आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

## गावदेवी प्रासादिक भजन मंडळ झुगरेवाडी प्रथम

**| कर्जत | प्रतिनिधी |**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत यांच्या वतीने ९० व्या गणेशोत्सवानिमित्त आदिवासी बांधवांसाठी भजनांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्येकर्जत-खालापूर तालुक्यातील सतरा आदिवासी भजनी मंडळानी सहभाग घेतला होता. यामध्ये कर्जत तालुक्यातील झुगरेवाडी येथील गावदेवी प्रासादिक भजन मंडळाने प्रथम क्रमांक पटकवला. या स्पर्धे साठी प्रसाद पाटील, श्रीधर भोसले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यास्पर्धेत प्रथम - गावदेवी प्रासादिक भजन मंडळ झुगरेवाडी यांनी प्रथम क्रमांक पटकवला. द्वितीय क्रमांक आदिवासी शबरीमाता भजन मंडळ वदप, तृतीय क्रमांक जय शबरीमाता भजन मंडळ डोणेवाडी, चतुर्थ क्रमांक शबरीमाता भजन मंडळ वाशिवली, पाचवा क्रमांक चेडोबा प्रासादिक भजन मंडळ बांगरवाडी यांनी मिळविला.




या प्रसंगी सुधाकर घारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, संतोष पाटील, अशोक राऊत, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सुचिता खोत, हर्षाली गायकवाड, नेहा शिंदे, मानसी कानिटकर, आदींनी भेट दिली.

पारितोषिक वितरण समारंभ मधुकर घारे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महेंद्र चंदन, आशिष गोखले, अभिजीत मराठे, पंकज शहा, प्रसाद पाटील, श्रीधर भोसले, विवेक भागवत, दीपक बडगुजर, किशोर वैद्य, प्रकाश पटवर्धन, अमित मराठे, मंगेश जोशी, रघुनाथ खैरे, निलेश परदेशी आदी उपस्थित होते.

## नागाव पिरवाडी समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम उत्साहात




**| उरण | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, फुंडे आणि सागरी विकास मंच, राऊंड फॉरेस्ट कांदळवन, उरण वन विभाग, लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस, यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील नागाव पिरवाडी समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. पर्यावरण संवर्धन, सागरी जैवविविधतेचे संरक्षण आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत सुमारे ५०० विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

महाविद्यालयासोबतच यू. इ. एस. कॉलेज, केडीएस कॉलेज, उरण तसेच काळसेकर कॉलेज, पनवेल येथील विद्यार्थ्यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी पर्यावरणीय समतोल, सागरी जैवविविधता आणि भविष्यातील अन्नसुरक्षेच्या दृष्टीने महत्त्व असल्याचे सांगितले.

कार्यक्रमासाठी हितेश शहा, कौशिक शहा यांचे कडून विद्यार्थ्यांना हातमोजे, मास्क, पिण्याचे पाणी व अल्पोपहार उपलब्ध करून देण्यात आला. तसेच नागाव व म्हातवली ग्रामपंचायतीच्या वतीने कचरा संकलनासाठी कर्मचारी व घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली.

याप्रसंगी वनपरिक्षेत्र अधिकारी, सागरी विकास मंचाचे कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामसुधारणा मंडळाचे सदस्य उपस्थित होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संदीप घोडके, प्रा. राम गोसावी, प्रा. बी. पी. पवार, डॉ. राजकुमार कांबळे, डॉ आर बी पाटील डॉ जावळे आर एस डॉ श्रेया पाटील डॉ पालवे डॉ तांदळे प्रा. गजानन चव्हाण, प्रा. श्रीकांत गोतपागर, डॉ. झेलम झेंडे, डॉ सोनावले प्रा. भूषण ठाकूर, प्रा. प्रांजल भोईर, प्रा तन्वी कोळी प्रा प्रियांका ठाकूर प्रा दीक्षित म्हात्रे, ऋतुजा घरत प्रा रेणू माळी प्रा. देवेंद्र कांबळे, प्रा. योगेश कुलकर्णी आदी सहभागी झाले.

## टीएमसीसी स्पेशालिटी कंपनीत रक्तदान शिबीर

**| चणेरा | प्रतिनिधी |**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या टीएमसीसी स्पेशालिटी कंपनीच्या वतीने गुरुवारी (दि. २४) सप्टेंबर रोजी कंपनीच्या परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शासकीय रक्त केंद्र, सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग, रायगड यांच्या वतीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले.



कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या शिबिराला कंपनीतील कंत्राटी कामगार, कायमस्वरूपी कामगार, स्टाफ कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी तसेच कंपनीचे अधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या शिबिरात तब्बल १०८ रक्त दात्यांनी रक्तदान करून १०८ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. रक्तदान शिबिराला रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले तर यावेळी शैलेंद्र साळवी, अनिल जांभळे, संतोष सातपुते, राकेश खांडेकर, निलेश शेंडगे, अनिकेत पाटील, केतन पवार, स्मिता परतने, ओमकार अलिम, अरुण माने, यांच्यासह कंपनीतील अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच युनियन कमिटीचे अध्यक्ष अनिल खैरे यांच्यासह मयूर चव्हाण, अमोल नाडार, मंगेश साळवी, सागर वेटकोळी, सचिन जाधव आणि प्रविण ठमके यांनीही शिबिराच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेतला.

**समाधानकारक पावसामुळे शेतकरी आनंदी | जलसाठ्यांच्या दृष्टीने मान्सून दिलासादायक**

# कोकण विभागात ९६.१ टक्के पावसाची नोंद

**| रायगड | प्रतिनिधी |**

यंदाच्या मान्सून हंगामात कोकण विभागात पावसाचे संमिश्र चित्र पाहायला मिळत आहे. मान्सूनच्या आकडेवारीनुसार रायगड, ठाणे आणि पालघर या उत्तर कोकणातील जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार घोडदौड करत गतवर्षीच्या तुलनेत अधिक पावसाची नोंद केली आहे. दुसरीकडे दक्षिण कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत मात्र यंदा पावसाने काहीशी पाठ फिरवल्याने गतवर्षाच्या तुलनेत तूट निर्माण झाली आहे.

संपूर्ण कोकण विभागाचा विचार करता विभागात २,५८०.२ मिमी या सरासरीच्या तुलनेत २,४७९.५ मिमी म्हणजेच ९६.१ टक्के पावसाची नोंद झाली आहे.



ठाणे जिल्ह्यात २,१७४.३ मिमी सरासरीच्या तुलनेत तब्बल २,३२०.१ मिमी म्हणजेच १०६.७ टक्के पावसाची नोंद झाली आहे. अंबरनाथ तालुक्यात सर्वाधिक म्हणजेच १२९.५ टक्के (२,२५३.२ मिमी) पाऊस झाला. त्यापाठोपाठ उल्हासनगर (१२३.० टक्के, रायगड जिल्ह्यात २२ सप्टेंबर २०२६ पर्यंत २८७१.२ मिमी म्हणजेच सरासरीच्या ९४.५ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

मुरबाड (११५.० टक्के ), भिवंडी (१०९.२ टक्के ), ठाणे (१०९.० टक्के ) आणि शहापूर (१०५.१ टक्के ) येथे मुसळधार पावसाची नोंद झाली, तर कल्याण तालुक्यात सर्वात कमी म्हणजे ९६.२ टक्के पाऊस झाला आहे.

पालघर जिल्ह्यात यंदा १०१ टक्के पावसाची नोंद झाली असून गतवर्षीच्या तुलनेत हे प्रमाण अधिक आहे, ज्यामुळे या भागातील शेतीला आणि जलप्रकल्पांना दिलासा मिळाला आहे.

### रायगड जिल्ह्यात तालुकानिहाय पाऊस

उरण १३९.२ टक्के (२७३४.० मिमी) पावसासह प्रथम क्रमांक पटकावला आहे. .अलिबाग (११५.५ टक्के ), पनवेल (११०.५ टक्के ), माणगाव (१०५.९ टक्के ), महाड (१०२.७ टक्के ) आणि खालापूर (१००.३ टक्के ) या तालुक्यांनी सरासरीची शंभरी ओलांडली आहे, तर श्रीवर्धन (८२.० टक्के ) आणि म्हसळा (८२.९ टक्के) हे तालुके वगळता उर्वरित संपूर्ण जिल्ह्यात चित्र समाधानकारक आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात १ जून ते ९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत २३,१४८.४६ मिमी म्हणजे ७६.४५ टक्के पाऊस पडला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही रत्नागिरीप्रमाणेच गतवर्षीच्या सरासरीच्या तुलनेत यंदा पाऊस कमी झाला असल्याचे दिसून येत आहे. उत्तर कोकणात झालेल्या समाधानकारक पावसामुळे भातशेती आणि जलसाठ्यांच्या दृष्टीने मान्सून दिलासादायक ठरला आहे.

## निवडक




### सुनिल ठाकूर यांना 'भारत गौरव श्री' पुरस्कार

**चिरनेर :** सुनील ठाकूर यांना माजी आ. बाळाराम पाटील यांच्या हस्ते भारत गौरव श्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. नवी मुंबईच्या कला साधना सामाजिक संस्थेच्या वतीने ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वांना मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले. यात राजन देसाई, डॉ. प्रकाश अंभोरे, गजेंद्र शेळके, जयकुमार चर्जन, अनिल डोंगरे, सुदत्ता साळवे, विनोद भंगाळे, सुभाष चव्हाण, प्रतिभा घोडके, सुमन देसाई, सचिन डाकी, मंगला डाकी, हेमलता गीते कमलेश परदेशी, पुनम पोटे, मिलिंद लांडे, कल्पना शेलार, तानाजी जाधव या सर्वांना भारत गौरव श्री पुरस्काराने गौरविण्यात आले. तर चंदन तोडणकर, जितेंद्र शिंदे, दिगंबर वारे, राजेंद्र चौधरी, एकनाथ पांचाळ, बित नाळकर, गीता आहीर, जितेंद्र जोशी, संजय पाटील, दिनेश रिकामे, सुमतीगिरी, गोसावी, सुरेखा सावंत, शशिकला पवार, रमेश उईके,आदीना डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आ. बाळाराम पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. माजी प्राचार्य व उपायुक्त रत्नाकर अहिरे, सतीश देशमुख अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्यासह अन्य




( छायाचित्र -संजय गायकवाड)

### दाताच्या उपचारांवर डॉ. कर्वे यांचे मार्गदर्शन

**कर्जत :** नेरळ येथील डॉ. कर्वे डेंटल क्लिनिकमध्ये ६ वे जीपी क्लिनिक नुकतेच आयोजित करण्यात आले. सर्वसाधारण वैद्यकीय व्यावसायिकांना दंत रुग्णांच्या उपचार व्यवस्थापनाबाबत आवश्यक आणि अद्ययावत माहिती देणे, तसेच कोणत्या परिस्थितीत रुग्णाला दंतचिकित्सकांकडे तातडीने पाठवावे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या क्लिनिकचे मार्गदर्शन डॉ. आशिष कर्वे यांनी केले. त्यांनी दंतविषयक आपत्कालीन परिस्थितींमध्ये प्राथमिक पातळीवर घ्यावयाची काळजी आणि योग्य वेळी दंतचिकित्सकांकडे रुग्णाला पाठविण्याचे महत्त्व याबाबत उपयुक्त माहिती दिली. यावेळी अध्यक्ष डॉ प्रशांत गांगल, डॉ. आदिती कर्वे, डॉ. कुमार ओसवाल, डॉ. श्रीकांत डहाके, डॉ. कुणाल राठोड, डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. संजीव पाटील, डॉ. भोपतराव, डॉ. आशुतोष कुलकर्णी आदी उपस्थित होते.




### आयुर्वेद दिनानिमित्त रॅलीचे आयोजन

**नागोठणे :** ११ व्या आंतरराष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त (दि.२३) सप्टेंबर रोजी वेलशेत येथील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या विद्या संकुलातील श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, वेलशेत-रोहा येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमांची सुरुवात वैद्या रेखा पांडें यांच्या मार्गदर्शनाखालील आरोग्य रॅलीने करण्यात आली. सर्व विद्यार्थ्यांनी आयुर्वेद प्रसारांच्या उद्घोषणांनी परिसर भारावून टाकला. यानंतर द्रव्यगुण विभागांतर्गत वैद्य अक्षरा चव्हाण यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष किशोर जैन, निशिगंध आठवले, अमर पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य अर्चिस पाटील यांनी केले. याप्रसंगी कार्तिक जैन, वैभव नांदगावकर, वैद्य नम्रता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



### विद्यार्थ्यांनी फुलवली परसबाग

**पाली/गोमाशी :** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष कृतीतून शेती, पर्यावरण, आरोग्य, स्वावलंबन आणि श्रमाचे महत्त्व समजावे, या उद्देशाने जि.प. शाळा दिघेवाडी, ता. सुधागड येथे शालेय परसबाग हा उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहे. या परसबागेत उत्पादित होणाऱ्या ताज्या आणि पौष्टिक भाज्यांचा उपयोग शालेय पोषण आहारासाठी करण्यात येत असून 'आपण पिकवलेले अन्न आपणच खातो' या भावनेतून अन्नाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजत आहे. विशेष म्हणजे, उत्पादित भाजीपाल्याची विक्री विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष बाजारात करून स्वावलंबन, व्यवहारज्ञान, आर्थिक साक्षरता आणि संवादकौशल्याचा अनुभव घेतला. उत्पादनापासून विक्रीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांनी स्वतः हाताळली. हा उपक्रम मुख्याध्यापक संजय थळे, संगीता अवताडे आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून पालक व ग्रामस्थांचेही मोलाचे सहकार्य लाभत आहे. 'पिकवा, शिका आणि निरोगी राहा' हा संदेश देणारी ही परसबाग इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### माणिक पाटील यांचे निधन

**उरण :** उरण परिसरातील माजी नगरसेवक व काँग्रेसचे जेष्ठ पदाधिकारी माणिक अनंत पाटील यांचे मंगळवारी (दि. २२) सप्टेंबर रोजी वयाच्या ७३व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने पाटील परिवारासह कोटगाव परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात परिवारातील मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर कोटनाका स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांचा दशक्रिया विधी गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता माणकेश्वर येथे होणार असून, उत्तरकार्य विधी रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता राहत्या घरी, कोटनाका येथे होणार आहे. सर्व कार्य राहत्या घरी, कोटनाका येथे होणार असल्याचे पाटील परिवाराच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## निवडक



### मुलींनी जपला भजनाचा वारसा

**पाली** : सुधागड तालुक्यातील टाटाचा माळ जांभूळपाडा येथील १४ ते १७ या अल्प वयोगटातील मुलींनी एकत्र येत स्थापन केलेले ममोरया भजनी मंडळफ सध्या संपूर्ण स्थानिक परिसर व जिल्ह्यात कौतुकाचा विषय ठरत आहे. या बालकलाकारांच्या भजनाची चर्चा रंगली असून त्यांच्या स्वरांनी सारेच मंत्रमुग्ध झाले आहेत. शिक्षिका अनुराधा गुरव यांच्या शेजारी राहणाऱ्या नितीन काळे यांच्या दोन मुली आराध्या काळे आणि आर्या काळे, तसेच त्यांच्यासोबत देविका अशोक कदम, सायली संतोष गुरव, प्राची गजानन वाघोसकर आणि श्रेया जितेंद्र काळे या सहा मुली प्रथमच भजन गाण्यासाठी एकत्र आल्या. त्यांच्यासोबत ढोलकी वादक म्हणून प्रथमेश शिर्के, जय वाघोसकर, मंथन वाघोसकर वेदांत वाघोसकर यश बिरवाडकर ही मुले साथ देऊ लागली. या नवोदित भजनी मंडळाला गेल्या गणेशोत्सवात अनुराधा गुरव यांच्या घरी उत्तम व्यासपीठ मिळाले. या सादरीकरणातून हे भजनी मंडळ यंदा अधिक परिपक्व झाले आहे. या बालकलाकारांना जयवंत गुरव, नितीन काळे आणि गजानन वाघोसकर यांचे मार्गदर्शन लाभले. याच वर्षी या भजनी मंडळाचे नामकरण मोरया भजनी मंडळ, टाटाचा माळ, जांभूळपाडा असे आर्या नितिन काळे यांच्या कल्पकतेतून करण्यात आले आहे. सिद्धेश गुरव, यश बिरवाडकर, यश वाघोसकर सचिन बामगुडे, संतोष गुरव आणि प्रसाद गुरव आणि राहुल देवकर यांनी या सहा मुलींना भजनाची बिदागी देऊन त्यांचा उत्साह वाढवला.

### पॉलिहाऊससाठी निविदा आमंत्रित

**रायगड** : कृषि चिकित्सालय फळरोपवाटिका, वेश्वी या प्रक्षेत्रावर उत्कृष्ट प्रतीची कलमे व रोपे निर्मितीसाठी पॉलिहाऊस दुरुस्ती, पॉलीटनेल दुरुस्ती तसेच नवीन हार्डनिंग शेड उभारणीची कामे करण्यात येणार आहेत. यासाठी एमआयडीएच नोंदणीकृत सेवा पुरवठादारांकडून बाबनिहाय स्वतंत्र निविदा मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी मंडळ, पुणे यांचे पत्र निर्गमित मार्गदर्शक सूचनांमध्ये निर्देशित केलेल्या मापदंडांच्या अधीन राहून सदर निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेअंतर्गत रोपे निर्मितीसाठी ५ नर्सरी पॉलीटनेल शेड उभारण्यात येणार असून, प्रत्येक पॉलीटनेलचा आकार १९ मीटर ३.५ मीटर राहणार आहे. यामध्ये सिंचन व्यवस्थेचाही समावेश आहे. ओव्हीपीएच पॉलिहाऊसची दुरुस्ती करण्यात येणार असून, त्याचे क्षेत्रफळ २५ मीटर २० मीटर आहे. या कामामध्ये २०० मायक्रॉन यू.व्ही. स्टॅबिलाईज्ड पॉलीथिन फिल्म व आवश्यक साहित्याचा पुरवठा व बसविण्याचे काम, संरचना उभारणी वगळता, समाविष्ट आहे. याशिवाय ग्राफ्ट्स व रोपे निर्मितीसाठी १ नवीन शेडनेटगृह उभारण्यात येणार आहे. त्याचा आकार ३६ मीटर २८ मीटर असून उंची ४ मीटर राहणार आहे. यामध्ये सिंचन व्यवस्थेचा समावेश आहे.सदर कामांसाठी संबंधित जागेची पाहणी, मार्गदर्शक सूचना, सविस्तर माहिती, अटी व शर्ती आणि निविदा दस्तऐवज कृषि चिकित्सालय फळरोपवाटिका, वेश्वी येथे उपलब्ध आहेत. निविदा १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता उघडण्यात येतील. इच्छुक एमआयडीएच नोंदणीकृत सेवा पुरवठादारांनी स्वतंत्र निविदा सादर करावी.

### चिल्हे येथे कृषीविषयक कार्यक्रम

**खांब** : तलाठी सजा चिल्हे यांच्या वतीने शेतकरी वर्गासाठी कृषीविषयक मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी व विशेषतः महिला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी तलाठी रोहित रांजणे, कृषी विमा प्रतिनिधी प्रद्युम्न ढोबळे, अमित आढारी, कोतवाल अवंतिका खामकर, हर्षदा महाडीक, प्रणिता शिंदे आदी उपस्थित होते. सध्याच्या बदलत्या परिस्थितीत कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने, शेतीची ढासळत चाललेली स्थिती आणि त्यावर शेतकरी वर्गाने कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या काळानुसार शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उपलब्ध शासकीय योजनांचा लाभ घेणे तसेच शेतीविषयक विविध उपक्रमांमध्ये शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. यावेळी शेतीसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र काढण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांच्या शेतातील ई-पिक पाहणी करण्यात आली. ई-पिक पाहणीचे महत्त्व आणि त्याचा शेतकऱ्यांना होणारा उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/ girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४
- O'NEST Group of Hotels येथे हाऊसकीपर, वेटर, ऑल राऊंडर शेफ, तातडीने हवे. ठिकाण: अलिबाग/रत्नागिरी. संपर्क: ९९७५५१६१२३.
- नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे: रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन २ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (३ जागा), ओरिएंटल कुक १ जागा, इंडियन चायनीज कुक १ जागा, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा What-sApp वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९९१८४६१२
- अलिबाग एसटीस्टॅन्डजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. संपर्क : ९७६४५४८६७९
- झेरॉक्स दुकानात मराठी टायपिंगसाठी मुलगी पाहिजे. संपर्क : ९९२१५५०१२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# नगरपंचायत झाली, पण पाणीप्रश्न कायम

- पाच वर्षांनंतरही पालीकरांच्या नशिबी गढूळ पाणी
- फिल्टर योजना नेमकी अडकली कुठे? पालीकरांचा संतप्त सवाल

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर होऊन पाच वर्षांचा कार्यकाळ संपत आला असतानाही पाली शहरातील पाणीप्रश्न अद्याप सुटलेला नाही. आजही अनेक पालीकरांना गढूळ व दूषित पाणी प्यावे लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नगरपंचायतीच्या माध्यमातून कायमस्वरूपी पाणीपुरवठा व फिल्टर योजनेचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र ही योजना नेमकी कुठे अडकली, असा सवाल आता पालीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर शहराच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्याची अपेक्षा नागरिकांना होती. नियमित पाणीपुरवठ्यादरम्यान पाण्याचा रंग गढूळ होणे, पाण्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांच्या तक्रारी निर्माण होणे, अशा समस्या कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



### योजना कागदावरच?

पालीकरांसाठी प्रस्तावित असलेली फिल्टर योजना नेमकी कोणत्या टप्प्यावर आहे, तिच्या मंजुरीची सद्यस्थिती काय आहे आणि प्रत्यक्ष कामाला विलंब का होत आहे, याबाबत नागरिकांकडून प्रशासनाकडे स्पष्ट माहितीची मागणी होत आहे. नगरपंचायतींच्या पाणीपुरवठा योजनांना मंजुरी मिळून त्या कार्यान्वित झाल्याचे चित्र असताना पालीची पाणी योजना अद्यापही रखडलेली असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

### निवडणुका आल्या की आश्वासनांचा पाऊस

फिल्टर योजनेच्या नावावर आजपर्यंत अनेकदा आश्वासने देण्यात आली. विविध निवडणुकांच्या काळात पालीकरांना पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्याची स्वप्ने दाखवण्यात आली; मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या नळाला अद्याप स्वच्छ पाणी मिळालेले नाही, अशी नागरिकांची भावना आहे.नगरपंचायतीचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपत असताना पाणीप्रश्न कायम राहिल्याने आता या योजनेच्या विलंबाची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न पालीकरांकडून विचारला जात आहे. प्रशासनाने फिल्टर योजनेची सद्यस्थिती, निधी, मंजुरी आणि काम सुरू होण्याची अपेक्षित तारीख याबाबत पारदर्शक माहिती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आश्वासनांपेक्षा आता प्रत्यक्ष शुद्ध पाणी हवे! अशी भावना पालीकरांमध्ये व्यक्त होत असून, आगामी काळात पाणीप्रश्नावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## विमला तलावाला नशेबाजांचा विळखा



- प्रशासनाकडून ठोस कारवाई करण्यात होतेय कसूर
- कठोर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहरातील नागरिकांसाठी विरंगुळ्याचे ठिकाण असलेल्या विमला तलाव परिसराला सध्या प्रेमीयुगुलांच्या उघड-उघड गैरवर्तनासह नशेबाजांचा विळखा पडल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. तलाव परिसरात दारूच्या रिकाम्या बाटल्या, डबे आणि इतर साहित्य पडलेले आढळून येत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकारांबाबत अनेकवेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये भीती आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विमला तलाव परिसरात काही प्रेमीयुगुलांकडून सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह वर्तन केले जात असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. दुसरीकडे तलाव परिसरात दारूच्या रिकाम्या बाटल्या आणि डबे आढळत असल्याने येथे रात्रीच्या वेळी मद्यप्राशन अथवा नशेचे प्रकार होत असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

विशेषतः एकट्या ये-जा करणाऱ्या मुली आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. परिसरात छेडछाडीचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी व चर्चा असल्याने नशेच्या अवस्थेत असलेल्या व्यक्तींकडून महिलांना त्रास होण्याची भीती महिला वर्गातून व्यक्त होत आहे.

विमला तलाव परिसरातील गैरप्रकारांबाबत यापूर्वीही अनेकदा तक्रारी करण्यात आल्या आहेत. प्रसारमाध्यमांनीही या समस्येला वाचा फोडली आहे. मात्र तक्रारी आणि वृत्त प्रसिद्ध होऊनही परिस्थितीत ठोस बदल होत नसल्याने प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागातील हा परिसर जर नशेबाज आणि टवाळखोरांसाठी मोकळे मैदान बनत असेल, तर ही उरणकरांसाठी गंभीर बाब आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता विमला तलाव परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, रात्रीच्या वेळी विशेष तपासणी करावी, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी आणि सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन, महिलांना त्रास देणे किंवा गैरवर्तन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## अकरा लाखांची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून अकरा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. योगेश सोनवणे मोबाईलवर शेअर मार्केटमधील व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून बीटीएसटी प्लॅन गुंतवणूक आणि आयपीओमधून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले आणि पिडी एंटरप्राइजेस येथील बँक खात्यावर वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांच्याकडून ११ लाख रुपये घेतले आणि लिंकद्वारे आणखी ३० लाख रुपये भरण्याची मागणी केली.

## कचराकुंड्यांच्या नियोजनाची मागणी



**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरान नगरपरिषदेच्या कचराकुंड्या वापराविना पडलेल्या दिसत आहेत. संबंधित विभागाने या सर्व कचराकुंड्या सुयोग्य ठिकाणी वापरात आणल्यास स्वच्छता राखण्यासाठी मदत होऊ शकते अशी स्थानिकांमधून मागणी केली जात आहे.

टेंडर प्रक्रिया पूर्ण करून कचराकुंड्या मागविण्यात आल्या होत्या पण त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अल्पवधीतच त्या वापराविना गंजून भंगारात जाण्याची वेळ आली आहे.

संबंधित जबाबदार लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे त्या धूळ खात पडून आहेत. सत्ताधारी गटाला याबाबत काहीएक स्वारस्य दिसत नाही.

> माथेरानमधील पॉईंट्सकडे जाणाऱ्या रस्त्यालगत योग्य ठिकाणी कचराकुंड्या, सूचनाफलक व जनजागृतीची व्यवस्था प्रशासनाने तातडीने करावी.पर्यावरण वाचले तरच पर्यटन वाढेल आणि पर्यटन वाढले तरच रोजगार व उदरनिर्वाह टिकेल.वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर काही दिवसांनी माथेरानची ओळख निसर्गरम्य पर्यटनस्थळ म्हणून नव्हे, तर प्लास्टिकच्या कचऱ्याचे गाव म्हणून होण्याची वेळ येईल.त्यामुळे प्रशासनाने विलंब न करता तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.
> -राकेश कोकळे
> स्वच्छता दूत, माथेरान.

## परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांना दिलासा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

परतीच्या पावसाच्या सरींमुळे उरण तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, शेतकरी सुखावला आहे. भाताच्या पिकांमध्ये दाणा तयार होण्याच्या मार्गावर असताना, परतीच्या पावसाच्या सरी बरसल्यामुळे येथील शेतकरी सुखावला आहे.

गणपतीचे आगमन झाल्यापासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र जमिनीतील पाण्याचा ओलावा खूप कमी झाल्यामुळे, भातपिकांना दाणे भरण्यासाठी पावसाची निकडीची गरज होती. त्यातच बुधवारी व गुरुवारी पावसाच्या चांगल्या सरी बरसल्या. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान दिवसभर पडणाऱ्या कडक उन्हाचा प्रत्येकाला सामना करावा लागत होता. रणरणत्या उन्हाच्या वातावरणामुळे ताप, सर्दी, खोकल्याच्या साथीत वाढ होताना दिसत आहे.



## पन्नास हजार रुपयांच्या मटेरियलची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अज्ञात इसमाने ५० हजार रुपयांच्या मटेरियलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २५ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मारुती उदगीरे हे रिमेल्टेड लीड हे मटेरियल ट्रकने पालघर येथून आळंदी पुणे येथे घेऊन जात होते. पहाटे तीनच्या सुमारास मुंबई पुणे हायवे लेनला अमेटी कॉलेजच्या आणि भाताण बोगद्याच्या मध्ये हायवे वरून आळंदी पुणे कडे जात असताना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनावरील इसमाने पन्नास हजार रुपये किमतीचे रिमेल्टेड लीड चोरून नेले.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत ॲड.पोतदार प्रथम

**| कर्जत | प्रतिनिधी |**

भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे माजी सनदी अधिकारी स्व. बी. जी. देशमुख यांच्या स्मरणार्थ २०२५/२०२६ या वर्षा साठी घेण्यात आलेल्या वार्षिक राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कर्जतच्या रहिवासी अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या सेवानिवृत्त शीक्षिका ॲड. प्रतिभा सुधीर पोतदार यांच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे युगफ या विषयावरील निबंधाला प्रथम क्रमांक मिळाला. या निबंध स्पर्धेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग, सोशल मिडिया आव्हाने आणि संधी, नागरिकांचे जीवन सुलभ करणे असे विषय देण्यात आले होते.

ॲड. प्रतिभा पोतदार कर्जत यांच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग या निबंधाला मिळाला प्रो.राजेंद्र ठोंबरे सांगोला यांच्या सोशल मिडिया आव्हाने आणि संधी या निबंधाला, द्वितीय क्रमांक योगंधरा बधे तळेगाव दाभाडे यांच्या सोशल मिडिया आव्हाने आणि संधी या निबंधाला तृतीय क्रमांक तसेच डॉ. शिल्पा जोशी छत्रपती संभाजी नगर यांच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग या निबंधाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. स्वाधिन क्षत्रिय यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी डॉ. सतबिर सिंग, विकास देवधर, जयराज चौधरी, शशांक बर्वे, सुधीर पोतदार, मैत्रेयी पोतदार, नीलम पेडणेकर, योगीनी गावडे, मिलींद साबळे आदींसह स्पर्धकांचे कुटुंबीय उपस्थित होते.



( छायाचित्र -संजय गायकवाड)

## पाच लाखांची ऑनलाईन फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

लिंकद्वारे मोबाईल हॅक करून पाच लाख वीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.कासिम कादर अली शेख हे सेक्टर चार कळंबोली येथे राहत असून त्यांच्या मोबाईलवर गाडीचा ट्रॅफिक चलन पडल्याचा मेसेज अनोळखी इसमाने पाठवला. मेसेजमधील लिंक कासिम यांनी ओपन करून पाहिले असता त्या लिंकद्वारे त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि त्यांच्या बँक खात्यातून पाच ट्रांजेक्शनद्वारे पाच लाख वीस हजार रुपये परस्पर विड्रॉल झाले आणि त्यांची फसवणूक झाली.

## कृष्णा खोरे विकास महामंडळातील गैरव्यवहाराची चौकशी करा

### मनसे अभियंता व कंत्राटदार संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागांतर्गत येणाऱ्या कृष्णा खोरे विकास महामंडळात कार्यरत असलेले संचालक डॉ. हनुमंत धुमाळ यांच्या कार्यकाळात प्रचंड अनागोंदी आणि गैरव्यवहार झाला असल्याचा संशय मनसे अभियंता आणि कंत्राटदार संघटनेने व्यक्त केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेतर्फे मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

संघटनेचे अध्यक्ष गौरव वालावलकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे की, डॉ. धुमाळ यांना सलग दोन वेळा सेवा विस्तार देण्यात आला आहे. या सेवा विस्तारामागे नेमके काय रहस्य आहे, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. याआधीही कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक बड्या कंत्राटदारांनी आपले राजकीय लागेबांधे वापरून, कोणतीही अर्हता नसताना हजारो कोटींची कामे मिळवली आणि स्वतःची तिजोरी भरली, असा आरोपही संघटनेने केला आहे.



नुकतेच राज्यभरातील शासकीय कंत्राटदारांनी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करून अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना द्याव्या लागणाऱ्या ७% ते ५६% टक्केवारीबद्दल तक्रार केली होती. तसेच, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगली येथील कार्यक्रमात काहीतरी ठेवल्याशिवाय कामे दिली जात नाहीत, त्यामुळे कंत्राटदार मारला जातो, असे वक्तव्य करून एकप्रकारे शासनातील भ्रष्टाचाराची कबुलीच दिली आहे, असेही निवेदनात म्हटले आहे.

जलसंपदा मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानातूनच या सर्व व्यवहारांची सूत्रे हलवली जात असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी तात्काळ हस्तक्षेप करावा आणि सलग दोनदा सेवा विस्तार मिळालेल्या डॉ. धुमाळ यांच्या संपूर्ण कार्यकाळातील कामांची निःपक्षपाती चौकशी करावी, अशी मागणी मनसे अभियंता आणि कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष गौरव वालावलकर, कार्याध्यक्ष अवधुत चव्हाण आणि सरचिटणीस अमित शिंदे यांनी केली आहे.

## खिशातून चार हजार काढून लुटले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पिस्तूलचा धाक दाखवून चालकाच्या खिशातील ४००० रुपये जबरदस्तीने काढून नेल्याप्रकरणी एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मारुती शिंदे यांना आरोपीने रॅपिडो कंपनीच्या ॲप्लीकेशनवरून संपर्क केला आणि पुणे ते सीबीडी जाण्यासाठी कार भाड्याने घेऊन त्यातून जात असताना सव्वादोनच्या सुमारास पुणे मुंबई एक्स्प्रेस वेवरील खालापूर टोल नाक्यावर कमरेला लावलेला पिस्तूल काढून मारुती शिंदे यांच्या डोक्याच्या डाव्या बाजूला पिस्तूल लावली आणि पिस्तूलचा धाक दाखवून लुटले.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे निर्देश | केंद्रीय भूजल मंडळातर्फे अहवाल सादरीकरण व माहिती प्रसार कार्यशाळा संपन्न

# वैज्ञानिक माहितीचा प्रभावीपणे उपयोग करावा

**| रायगड | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील भूजल संसाधनांचे वैज्ञानिक पद्धतीने नियोजन, संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत तयार करण्यात आलेल्या अहवालातील वैज्ञानिक माहितीचा विविध विभागांनी प्रभावीपणे उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

जिल्ह्यातील भूजल व्यवस्थापनासाठी हा अहवाल अत्यंत उपयुक्त असून, त्यातील निष्कर्षांचा विकासकामे व नियोजनात उपयोग करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे केंद्रीय भूजल मंडळ तर्फे राष्ट्रीय जलधारक स्तर नकाशांकन व व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत अहवाल सादरीकरण व माहिती प्रसार कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह जिल्हा व राज्यस्तरीय विविध शासकीय विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रारंभी केंद्रीय भूजल मंडळ, पुणेच्या पौर्णिमा बराहाते यांनी रायगड जिल्ह्यातील जलधारक स्तरांचे नकाशांकन विषयावर सादरीकरण केले. यामध्ये जिल्ह्यातील भूजल उपलब्धता, जलधारक स्तरांची स्थिती, भूजल पातळी, भूजल गुणवत्ता, पुनर्भरण क्षमता, भूजल उपशाची स्थिती तसेच विविध भागांतील भूजल व्यवस्थापनाच्या गरजांबाबत वैज्ञानिक माहिती सादर करण्यात आली. हेमलता व्ही. यांनी अंतर्गत माहिती प्रसार विषयावर सादरीकरण केले. कार्यक्रमांतर्गत संकलित व विश्लेषित केलेल्या वैज्ञानिक माहितीचा उपयोग जिल्हा प्रशासन तसेच विविध विभागांच्या नियोजन प्रक्रियेत कशा प्रकारे करता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेत कृषी, जलसंधारण, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा तसेच इतर संबंधित जिल्हा व राज्यस्तरीय विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी सहभागी झाले. स्थानिक भूजल परिस्थितीचा विचार करून विविध विभागांच्या योजनांमध्ये जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि भूजल स्रोतांचे संरक्षण याबाबत उपाययोजना राबविण्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. अंतर्गत तयार करण्यात आलेली माहिती भूजल संवर्धन, कृत्रिम भूजल पुनर्भरण, पाणलोट विकास, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण, सिंचन नियोजन तसेच भूजलाच्या शाश्वत वापरासाठी उपयुक्त ठरणार आहे.

भूजल हे पिण्याचे पाणी, शेती आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वाचे नैसर्गिक संसाधन असल्याने त्याचे वैज्ञानिक पद्धतीने नियोजन, संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

### कार्यशाळेतून समन्वय

या कार्यशाळेमुळे रायगड जिल्ह्यातील भूजल संसाधनांबाबत उपलब्ध वैज्ञानिक माहितीचा प्रत्यक्ष नियोजन व विकासकामांमध्ये उपयोग होण्यास चालना मिळणार असून, भूजल संवर्धन आणि शाश्वत व्यवस्थापनासाठी विभागीय समन्वय अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. या वैज्ञानिक माहितीचा संबंधित विभागांनी त्यांच्या नियोजनात समावेश केल्यास भूजल संसाधनांच्या प्रभावी व्यवस्थापनास मदत होणार असून त्याचा फायदा रायगडच्या जनतेला होणार आहे.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, विभागीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील सावंतवाडी स्थानकावर प्रवासी लिफ्ट (02 नग) पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन करण्याचे काम (26 प्रवासी लिफ्ट / 1768 किग्रॅ / 1 वेग / 2 मजले / 2 थांबे / स्टेनलेस स्टील (1.5 मिमी) कार केबिन). आरडीएसओच्या मंजुरी आणि विनिर्देशानुसार. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/28/2026 दिनांक 29/09/2026, अंदाजित खर्च** – ₹ 85,76,272/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 1,71,500/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 13/10/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी विभागीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर २०६/३/७, एकूण क्षेत्र ३-२५-०० आर.चौ.मीटर, आकार ३२.५० रू.पै., ही बिनशेती मिळकत तसेच या मिळकतीतील ग्रुप ग्रामपंचायत किहीम हद्दीतील, मालमत्ता क्र.१९६०, क्षेत्र ९८.१४ चौ.मीटर तळ मजला, क्षेत्र ९४.१४ चौ.मीटर वरचा मजला, ही घर मिळकत, ही बिनशेती मिळकत व घर मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक झहिरा अजीम अन्सारी रा. दर्गा रोड, नारायणपेठ, मेहबुब नगर, तेलंगणा, ५०९२१० सध्या रा.मु.पो.किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २८/०९/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल. श्रीम. मृणाल महेंद्र म्हसे यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत श्री. यशवंत काशिनाथ दहीवलीकर, श्री.कैलास काशिनाथ दहीवलीकर, श्री.अरूण काशिनाथ दहीवलीकर, श्रीम.बेबी महादेव पारणेकर व श्रीम.चंदा राजाराम खानिवडेकर त्यांच्याकडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै ) |
|---|---|---|---|
| ३३ | ११ | ०-१०-४० पो.ख. ०.०१.०० | ०.७२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीशी इतर कोणाचा ही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे-येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधीत व्यक्तींनी अगर संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत कळवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. तसेच कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल विक्री व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

कर्जत. दि.२९/९/२०२६
रा. देवपाडा ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९७६३०२४६९७

**ॲड. निवृत्ती दा. झोमटे**
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री बाबु ठाकुर रा नेरुळ नवी मुंबई हे खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री नथुराम गोपाळ हरपुडे रा. कर्जत यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**बिनशेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मुद्रे खुर्द, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील बिनशेतजमीन मिळकत सर्व्हे नं २२/१/अ/३ एकुण ०.०९.३३ गुंठे आर चौ.मी जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २९/०९/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मनोहर संभाजी वर्तक व २) भालचंद्र संभाजी वर्तक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| किहीम | ३५९ | ०-४९-५० पो.ख.०-०९-७० ०-५९-२० | ४.९३ |

**पैकी १) मनोहर संभाजी वर्तक व २) भालचंद्र संभाजी वर्तक यांचे मालकीच्या व ताबेकब्जावहिवाटीतील० हे. १९.२० आर, आकार १ रूपया ५९ पैसे एवढी मिळकत. (सदर मिळकत)**

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २९/९/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. राजेंद्र सदाशिव अष्टेकर व श्रीमती स्वाती राजेंद्र अष्टेकर. रा. ड्रीम कॉम्पलेक्स ३ब/१७०७ एल.बी.एस. मार्ग, ड्रीम मॉलच्या मागे, भांडुप वेस्ट, मुंबई, महाराष्ट्र ४०००७८. यांचेकडुन त्यांचे मालकीच्या मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जिल्हा रायगड येथील शेतजमीनीची मिळकत कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| सर्वे कमांक/हिस्सा कमांक | हे.आर.चौ.मी. | आकारणी रूपये पैसे |
|---|---|---|
| ८९/२/अ | ०.४०.०० पो. ख. ०.००.०० ०.४०.०० | ०.३७ |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली शेतजमीनीची मिळकतीमधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी, जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहीवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तदंगभुत सर्व वस्तु, हक्क हितसंबंध व तीमध्ये जाणारे रस्त्याचे वापराचे निरंतरचे हक्क यासुद्धा वर वर्णन केलेल्या शेतजमीनीच्या मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट, बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार, लिएन अगर कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन पंधरा दिवसाचे आत खाली सही करणार यांचे कडे प्रथमदर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मागाहुन उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २९/०९/२०२६

सही /-
**ॲड.रजनी एस. सोनावळे ( साळवी)**
बी.ए.एल एल.बी. ॲडव्होकेट.
व्हिजन ग्लोरी, ए विंग, २०३, रेल्वे कोलेनी जवळ.
भिसेगाव कर्जत ४१०२०१.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशील श्री. सुरेंद्र आत्माराम पाटील रा. घर नं.२९५४, प्लॉट नं.३, अलिबाग को.ऑप.बँकेच्या मागे, तांडेलवाडी जवळ, उरण करंजा रोड, ता.उरण, जि. रायगड यांच्या मालकीची व ताबाकब्जाची मौजे तळवली तर्फे खंडाळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| गट नंबर | क्षेत्र (हे. आ. पॉ.) | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १६४ | ०-२२-२ पो.ख. ०-०२-२ | ३.३१ |
| एकुण क्षेत्र ०-२४-२ | | |

वर नमुद केलेल्या मिळकतीस सोयीकरीता ''सदर मिळकत'' असे संबोधण्यात येईल. सदर मिळकती बाबतीत आमच्या अशिलांशिवाय इतर काही व्यक्ती विक्रीचा व्यवहार करीत आहेत. तरी, आमचे अशील श्री. सुरेंद्र आत्माराम पाटील यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही व्यक्तींना सदरची मिळकत एकट्याने विकण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सदर मिळकतीमध्ये आमचे अशीलांचा ताबाकब्जा, मालकीहक्क व अधिकार आहे. सदर मिळकतीबाबत वाद हा न्यायालयात प्रलंबित आहे.

सबब, या जाहीर नोटीसीने सर्व लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबतीत आमच्या अशिलांव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीसोबत कोणत्याही प्रकारचे साठेकरार, खरेदी विक्री, गहाण, लिज, लिन, पोटगी, ताबाकब्जा, बोजा, मृत्यूपत्रांकीत दान व गहाण, फरोक्तखत अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध निर्माण केल्यास आमचे अशिल योग्य ती न्यायालयीन कारवाई करतील. तरी सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करू नये आणि केल्यास तो बेकायदेशीर ठरवला जाईल, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली.

दिनांक : २९/०९/२०२६
ठिकाण : उरण

**ॲड.अपूर्वा एच् ठाकूर**
कार्यालयीन पत्ता : २१५ डी, शिवम को.ऑ.हौ. सो.लि.,वीर सावरकर मैदानासमोर, करंजा रोड, उरण, ता. उरण, जि. रायगड, ४००७०२

## ग्रुप ग्राम पंचायत वाशी
**ता. पेण, जि. रायगड ४०२१०७ स्थापना १९५१**

**उपसरपंच** श्री. ऋतिकेश गजानन ठाकूर
**सरपंच** श्री. संदेश शंकर ठाकूर (मो. ९७६२१४९००५)

जावक क्र. - २१५/२०२६ दिनांक - २३/०९/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत वाशी ता. पेण जि. रायगड हद्दीतील ड्रायव्हर लाईसन्स प्राप्त उमेदवाराकडून ग्रा.पं.मध्ये ड्रायव्हर कम सफाई कामगार पदासाठी अर्ज मागविण्यांत येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी ग्रामपंचायत वाशीकडे योग्य त्या कागदपत्रासह अर्ज दि.०५/१०/२०२६ पर्यंत सादर करावे.

**शैक्षणिक पात्रता :-**
१) फोरव्हीलर ड्राइविंग लायसन्स असणे आवश्यक.
२) गाडी चालवण्याचा १ वर्षाचा अनुभव.
३) स्थानिक रहिवाशी असणे आवश्यक.
४) घंटागाडी चालवीणे व सफाई काम करणे बंधनकारक राहील.

**अटी व शर्ती**
१) मुलाखत घेऊन निवड करण्यात येईल. सदर पदावर नियुक्ती ही तात्पुरत्या (हंगामी) स्वरूपात राहील.
२) ग्रामपंचायत मार्फत सांगितलेली सर्व कामे करणे बंधनकारक राहील.
३) नियुक्ती करण्याचा अंतिम अधिकार ग्रामपंचायतचा राहील.
४) सदर अर्ज मिटिंग मध्ये ठेऊन वैद्य अर्जदारास मुलाखतीला बोलवण्यात येईल. मुलाखत वेळ, दिनांक स्वतंत्र कळविण्यात येईल.

कळावे,

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**श्री राजेंद्र सोपान गुडदे**
**ग्रुप ग्रामपंचायत वाशी**
**ता. पेण, जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**संदेश शंकर ठाकूर**
**ग्रुप ग्रामपंचयत वाशी**

## ग्रुप ग्रामपंचायत वाशी
**ता. पेण, जि. रायगड ४०२१०७ स्थापना १९५१**

**उपसरपंच** श्री. ऋतिकेश गजानन ठाकूर
**सरपंच** श्री. संदेश शंकर ठाकूर (मो. ९७६२१४९००५)

जावक क्र. - २१६/२०२६ दिनांक - २३/०९/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत वाशी ता. पेण जि. रायगड हद्दीतील ग्रा.पं मालकीचे पाणी शुद्धीकरण केंद्रावर देखभाल करिता सुज्ञ व्यक्तीची हंगामी स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती करणेत येत आहे. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी दि.०५/१०/२०२६ पर्यंत अर्ज ग्रा.प कडे कार्यालयीन वेळेत सादर करावी.

**अटी शर्ती :-**
१) इलेक्ट्रिशनचे ज्ञान असणे गरजेचे आहे.
२) स्थानिक उमेदवार असावा.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर ओढांगी रहिवाशी असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
४) येणाऱ्या प्रत्येक नागरिकांना पाणी भरून देणे गरजेचे आहे.
५) आर.ओ.फिल्टर प्लांट चालु बंद करणे व वीज पुरवठा सुरक्षित ठेवणे, टाकी भरणे इत्यादी कामे करावी लागतील आणि इलेक्ट्रिशनचे काही कामे असतील ते करावे लागतील.
६) १ पेक्षा जास्त उमेदवार अर्ज प्राप्त झाल्यास मुलाखत घेऊन निवड करणेत येईल.
७) सदर कामाचे मानधन दरमहा ५००० देण्यात येईल.
८) आर. ओ. फिल्टर प्लांटच्या सभोवताची स्वच्छता करावी लागेल.
९) आर.ओ. फिल्टर प्लांट बाबत सर्व अधिकार ग्रा.प कडे राहतील व निवडीचे अंतिम अधिकार ग्रा.पं चे राहतील.

कळावे,

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
**श्री राजेंद्र सोपान गुडदे**
**ग्रुप ग्रामपंचायत वाशी**
**ता. पेण, जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**संदेश शंकर ठाकूर**
**ग्रुप ग्रामपंचयत वाशी**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णन केलेली जमिन मिळकत ही नमुद मालक व कब्जेदार यांचेकडून आमचे आशिल श्री. कंकण पांडूरंग करावकर व इतर यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिनीचे मालकी हक्काबाबत खात्री करुन घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे शिळोशी, ता.सुधागड, जि.रायगड**

| भूमापन क्रं. | उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार | कब्जेदारांचे नांव |
|---|---|---|---|---|
| ४६ | २ | ०-६९-८० पो.ख. ०-०७-६० एकुण ०-७७-४० | ५.७५ | श्री.प्रशांत नेपाल मैती |

वरील जमिन मिळकतीवर अथवा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षीस, फरोक्त तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोताकरार वा तत्सम कोणत्याही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आंत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे व समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क हितसंबंध नाहीत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीच्या हस्तांतरणाचा व्यवहार पुर्ण करतील, व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
ता.२८/०९/२०२६

**ॲड. प्रविण दा.भोईर**
शॉप नं.९८, नगरपालिका कॉम्पलेक्स, वासूदेव बळवंत फडके नाटयगृहाचे बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि मो.९९२०७७३९८८

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री.दिपक केशरीमल जैन व सौ. रिना दिपक जैन यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकती हया पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधित माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड | ४६/४/अ/२ | ५-१७-०० | ५१.७० |
| | ४६/४/अ/३ | ५-००-०० | ५०.०० |

अलिबाग,
दिनांक : २६/०९/२०२६

सही/-
**MAHESH S. MHATRE**
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor, Flat No.1.Ch. Shivaji Chouk, Near Gawade Optics, Alibag Raigad

## पनवेल महानगरपालिका
**पशुवैद्यकीय विभाग**
**।। जाहीर आवाहन ।।**

**''जागतिक रेबीज दिन २०२६'' निमित्त पाळीव व भटक्या श्वानांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम**

रेबीज या प्राणघातक आजाराचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्याच्या उपायांना बळकट करण्यासाठी दरवर्षी २८ सप्टेंबर हा ''जागतिक रेबीज दिन'' म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२६ साठी "Stronger Together" (एकत्र येऊन अधिक मजबूत) ही अधिकृत संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. या संकल्पनेअंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात पशुवैद्यकीय फिरत्या दवाखान्यांद्वारे दिनांक २८ सप्टेंबर २०२६ ते ०३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पाळीव व परिसरातील भटक्या श्वानांसाठी मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

**लसीकरण शिबिरांचे सविस्तर वेळापत्रक:**

| दिनांक | वेळ | ठिकाण | ठिकाण |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | पोलीस हेडकॉटर, कळंबोली. | गावदेवी मंदीर जवळ, देवीचा पाडा. |
| २९.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | DAV स्कुल जवळ, न्यु पनवेल. | छत्रपती शिवाजी विद्यालय, रोहिंजण. |
| ३०.०९.२०२६ | १०.३० ते ६.०० | सिडको ऑफिसच्या बाजुला, कामोठे. | प्रशांत कॉर्नरजवळ, सेक्टर ३५ खारघर. |
| ०१.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | महात्मा स्कुलच्या जवळ, खांदा कॉलनी. | उत्सव चौक, खारघर. |
| ०२.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | वडाळे तलाव, पनवेल. | शिल्प चौक, खारघर. |
| ०३.१०.२०२६ | १०.३० ते ६.०० | पांजरपोळ, टपाल नाका, पनवेल. | फुड वे हॉटेल जवळ, सेक्टर २०, तळोजा फेज २. |

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना तसेच प्राणीप्रेमींना जाहीर आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपल्या पाळीव श्वानांना व परिसरातील भटक्या श्वानांना या फिरत्या लसीकरण केंद्रांवर आणून मोफत रेबीज प्रतिबंधात्मक लस देऊन सहकार्य करावे आणि पनवेल महानगरपालिकेस 'रेबीजमुक्त' बनवण्याच्या या मोहिमेत सहभागी व्हावे.

सही/-
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मौजे बामणोली, ता. अलिबाग जिल्हा रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १ कै.लक्ष्मी नारायण घरत, मयत तर्फे कायदेशीर वारस, १/१) श्री. शशिकांत नारायण घरत, १/२)श्री.हरिश्चंद्र नारायण घरत, १/३) श्री.शंकर नारायण घरत, १/४) श्री. विश्वनाथ नारायण घरत, १/५) सौ.माधुरी मधुकर चेरकर, १/६) सौ. मोहिनी मनोहर पाटील,१/७) सौ.रंजना रामकृष्ण पाटील, २)श्री.रामचंद्र हरि म्हात्रे, ३) श्रीमती.सिताबाई शांताराम म्हात्रे यांसकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बामणोली, ता.अलिबाग | १६६ | ०-३१-०० पो.ख. ०-०५-५० एकुण क्षेत्र ०-३६-५० | ८.६३ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील २१ (एकवीस) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग,
दिनांक- २९/०९/२०२६

सही /-
**ॲड.समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर,**
जिल्हा न्यायालय, रायगड
पत्ता- मु. लोणारे, पो.थळ,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ७७१९९०७२६१

### शुद्धीपत्रक

दैनिक कृषिवल च्या दिनांक २५/०९/२०२६ रोजी पान क्र.७ वर प्रसिद्ध झालेल्या कर्जदार सौ.प्रणिता विवेक मांजरेकर मु. कोशिंबळे तर्फे तळे ता. माणगाव जि. रायगड यांचे नमुना Z नोटीसमध्ये मिळकतीचे क्षेत्रफळ. ०-९५.०० ऐवजी ०-९५-३० असे वाचावे.

### ई-लिलाव सूचना

**अंदाजे 11,200 किलो खराब झालेला एमएस स्क्रॅप (रिइन्फोर्समेंट स्टील) आणि अंदाजे 7,800 किलो एचटी स्ट्रँड्स**

इच्छुक खरेदीदारांना "अंदाजे 11,200 किलो खराब झालेला एमएस स्क्रॅप (रीइन्फोर्समेंट स्टील) आणि अंदाजे 7,800 किलो एचटी स्ट्रँड्स" यांच्या "प्रति किलो" दराने होणाऱ्या विल्हेवाटीसाठी ई-लिलावात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. सदर भंगार "जसे आहे, जिथे आहे", "जे काही आहे" आणि "कोणतीही तक्रार नाही" या तत्त्वावर विकले जाईल आणि ते **मेसर्स रवी इन्फ्राबिल्ड प्रोजेक्ट्स लि.** यांच्या मालकीचे आहे. सदर साहित्याची पाहणी बेस कॅम्प, देवाळे फाटा, देवाळे, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - 415007 येथे **29-09-26 ते 08-10-26** दरम्यान फक्त कामकाजाच्या दिवशी **सकाळी 10 ते सायंकाळी 5** या वेळेत करता येईल. पाहणीसाठी कृपया **श्री. प्रसाद कुलकर्णी यांच्याशी 9561760665** या क्रमांकावर संपर्क साधा.

**ई-लिलाव दिनांक 09-10-26 रोजी आयोजित केला जाईल.**

ई-लिलावाच्या अटी व शर्ती असलेला फॉर्म मिळवण्यासाठी, कृपया **मिस. सलोनी खटाटे 8591284406** या क्रमांकावर संपर्क साधा किंवा **https://www.sealthedeal.co.in/** या वेबसाइटवरून डाउनलोड करा.

**लिलावकर्ते: सील द डील,** नोंदणीकृत कार्यालय पाचवा मजला, कार्यालय क्रमांक 2, किंग्स मॉल, रोहिणी सेक्टर 10, दिल्ली-11085.

**फॉर्म आणि ईएमडी डिमांड ड्राफ्ट सादर करण्याची अंतिम तारीख 08-10-26 आहे.**

## सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस १) श्री. विजय गणपतराव बुक्कावार, राहणार- ९०२, ए-विंग, सावोज रहेजा गार्डन, एलबीएस रोड, ठाणे-४०० ६०४, २) श्री. सचिन आनंद मुकेवार, राहणार- भूखंड क्र. एम-२१, निवारा तात्या टोपे नगर, डब्लुएचसी रोड, विवेकानंद नगर, नागपूर, महाराष्ट्र-४४० ०१५ ३) श्री. अमिताभ बद्रीनारायण शर्मा, राहणार- फ्लॅट नं ७०१, भूखंड क्र. १८७, तुलीप अपार्टमेंट, शिवाजी नगर, नागपूर महाराष्ट्र- ४४० ०१० (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) सोनाली महेंद्र घरत ऊर्फ सोनाली मयुरेश चौधरी २) शुभांगी महेंद्र घरत ३) मयुरेश प्रकाश चौधरी ४) प्रित विश्वनाथ म्हात्रे यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्रासाठी मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३३०५ | २२/०९/२०२६ | पुष्पक नोड | २६ | ३४५ | १२४०.०० चौ.मी. | ५/६/२०२३ | ६/६/२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३६/२०२६-२७

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. वसंत मुकुंद नामजोशी, रा. किर्तीमालिनी नामजोशी वापू कुटीर, आंबा माता मंदिर समोर घर नं.११७/१ भिसेगाव, कर्जत, रायगड, महाराष्ट्र ४१०२०१. सौ.आरती कौस्तुभ शेवडे रा.कौस्तुभ शेवडे, डि २१०३, ईस्टर्न, ग्रोव्हस, बिल्डींग नं.१६१, रोड नं २, अपोझिट ॲक्सिस बँक, कन्नमवार नगर, मुंबई, सिटी मुंबई, सबर्बन, महाराष्ट्र ४०००८३. व श्रीमती. रसिका विनायक देवधर, रा.२/११ अरविंद नगर, कुर्ला, कलीना रोड, बँक ऑफ बडोदा समोर, कलिना, सांताक्रुझ पुर्व, सांताक्रुझ पी आणि टी कॉलनी, मुंबई, महाराष्ट्र ४०००२९. यांचेकडुन त्यांचे मालकीच्या मौजे भिसेगाव, ता.कर्जत, जिल्हा रायगड येथील बिनशेतजमीनीची मिळकत व त्यावरील घर मिळकत कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

| सर्वे क्रमांक/ हिस्सा कमांक | हे.आर.चौ.मी. | आकारणी रूपये पैसे |
|---|---|---|
| ४६/१/अ/३ | ५-१५-०० बिनशेती प्लॉट व त्यावरील ६३.०० चौ.मी. घर क्र.११७ ची मिळकत | १०.३० |

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली बिनशेती प्लॉट मिळकत व त्यावरील बांधकाम केलेले क्षेत्र या मधील दगडमाती, झाडझाडोरा, पाणी, जाण्यायेण्याचे मार्ग व हक्क, वहीवाटीचे व इजमेंटचे मार्ग व हक्क वगैरे तद्ंगभुत सर्व वस्तु, हक्क हितसंबंध व तीमध्ये जाणारे रस्त्याचे वापराचे निरंतरचे हक्क यासुद्धा वर वर्णन केलेल्या शेतजमीनीच्या मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, कबजा, लिज, कुळवहिवाट, बोजा, ताबा, इजमेंट, साठेकरार, लिएन अगर कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन एकविस दिवसाचे आत खाली सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह तसे लेखी कळवावे. सदर मुदतीत आमचेकडे कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर मागाहून उपस्थित केलेली कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २९/९/२०२६
सही/-
**ॲड. रजनी एस. सोनावळे (साळवी)**
बी.ए.एलएल.बी.ॲडव्होकेट.
विजन ग्लोरी, ए विंग, २०३, रेल्वे कोलेनी जवळ.
भिमेगाव. कर्जत ४१०२०१.
मो. नं ९८६०७७८३२८

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याच[illegible]ने- तन्मणी, चींचपेटी, [illegible]गड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

निवडक

## शालेय कॅरमपटूंची उत्तुंग कामगिरी



**मुंबई :** आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे एमएससी बँक प्रायोजित मुंबई महापौर चषक शालेय कॅरम स्पर्धेत आयईएस सुळे गुरुजी शाळेची ग्रीष्मा धामणकर, महात्मा गांधी विद्यालयची तनया दळवी, विश्ववारणा पब्लिक स्कूल कोल्हापूरचा अतुल पाटील, श्री नारायण गुरु हायस्कूलचा उमैर पठाण, शारदाश्रम विद्या मंदिरचा सोहम जाधव आदींनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. दमदार प्रारंभ करणाऱ्या गौरी सावंतचे आव्हान निर्णायक क्षणी अचूक खेळ करीत ग्रीष्मा धामणकरने संपुष्टात आणले. प्रारंभापासून मोठी आघाडी घेत विश्ववारणा स्कूल कोल्हापूरच्या अतुल पाटीलने यश घाडीला नमविले. सुरुवातीचे बोर्ड हातून निसटल्यामुळे दबावाखाली खेळणाऱ्या सारा देवनला राष्ट्रीय ख्यातीची सबज्युनियर कॅरमपटू तनया दळवीने चकविले. इतर सामन्यात सोहम जाधवने मोइनुद्दिन शेखचा, उमैर पठाणने मोहमद हुसेनचा तर वेदांत मांढरेने आर्यन घाडीचा पराभव करून उपउपांत्यपूर्व फेरी जिंकली.

## भारताने ऑस्ट्रेलियाला २१७ धावांवर केले ऑलआऊट

**राजकोट :** भारताच्या अंडर-१९ संघाने ऑस्ट्रेलियाच्या अंडर-१९ संघाला पहिल्या युवा कसोटीच्या पहिल्याच दिवशी २१७ धावांवर ऑलआऊट केले. भारताकडून ईशान ओमने ५३ धावा देत ५ बळी घेतले. वेगवान गोलंदाज मोहित उल्वाने ३७ धावा देत ३ बळी टिपले.ऑस्ट्रेलियासाठी ब्लेक कॅटलने १०२ धावांची खेळी केली. भारताने दिवसाचा खेळ संपेपर्यंत १ षटकात ८/० धावा केल्या आहेत. लक्ष्य रायचंदानी ८ आणि सागर विर्क ० धावांवर नाबाद आहेत. ऑस्ट्रेलियाची सुरुवात खराब झाली. मोहित उल्वाने हेडन बारबुलोविक आणि कर्णधार मॅथ्यू लॉफ यांना लवकर बाद करत ७ धावांवर दोन बळी मिळवले. त्यानंतर ओमने नील पटेलला ११ धावांवर पायचीत केले. ऑस्ट्रेलियाची अवस्था २७/३ अशी झाली होती.यानंतर ब्लेक कॅटल आणि जेड हॉलिक यांनी डाव सावरला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी १४७ धावांची भागीदारी केली. कॅटलने ४०व्या षटकात चौकारासह अर्धशतक पूर्ण केले, तर हॉलिकने १६ षटकांनंतर अर्धशतक झळकावले.६५व्या षटकात उल्वाने हॉलिकला यष्टिरक्षकाच्या हातून झेलबाद करून ही भागीदारी तोडली. हॉलिकने १६० चेंडूंवर ५९ धावा केल्या.यानंतर कॅटलने आपले शतक पूर्ण केले. त्याने १९८ चेंडूंवर १०२ धावा केल्या.

## जिल्हा कबड्डी निवड चाचणीला सुरूवात



**ठाणे :** संघर्ष मंडळ, रॅडीकल स्पोर्ट्स, ओम् संघ, श्री स्वामी समर्थ यांनी ठाणे जिल्हा कबड्डी असो. ने विजय मंडळाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या कुमार गट कबड्डी स्पर्धेत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. जय बजरंग-वाशिंदने दोन्ही सामने जिंकत बाद फेरी गाठली. भिवंडी, काल्हेर येथील विजय मंडळाच्या पटांगणावर सुरु असलेल्या कुमारांच्या अ गटात संघर्ष मोहने संघाने ग्रीफिन जिमला चकविले. मध्यंतरला १२-०९ अशी आघाडी घेणाऱ्या संघर्षने नंतर सावध खेळ करीत हा निसटता विजय मिळविला. हर्ष साळुंखे, मंथन सोनकर यांच्या संयमी व धोरणात्मक खेळाला याचे श्रेय जाते. ग्रीफिनच्या आशिष धनावडे, श्रेयस पवार यांनी शेवटच्या क्षणापर्यंत निकराची लढत दिली. उजाला-वळ संघाने ड गटात पूर्वार्धातील पिछाडीवरून वास्को स्पोर्टस् चा १८-१५ असा पाडाव केला. जावेद व एजाज या चौधरी बंधुच्या आक्रमक खेळाला याचे श्रेय जाते. वास्कोच्या मयुरेश वाघ, सुजल गायकर यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला. ओम् संघाने क गटात छत्रपती शाहू संघावर २७-२२ असा विजय मिळविला. यग्नेश भोपी, प्रसाद यांच्या चढाई, पकडीच्या खेळाने त्यांनी ही किमया केली. छत्रपती शाहूच्या सुगंध राजभर याने एकाकी लढत दिली. रॅडीकल स्पोर्टस्ने ई गटात ओम् वर्तक ठाणे संघाचा २९-२५ असा पराभव केला.

## ॲथलेटिक्समध्ये पदक लयलूट

**नागोया :** जपान येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय क्रीडापटूंनी ॲथलेटिक्सच्या विविध प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत पदकांची कमाई केली. पुरुषांच्या उंच उडीत सर्वेश कुशारे आणि महिलांच्या लांब उडीत ॲन्सी सोजन यांनी रौप्यपदक पटकावले. तसेच ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीत पारुल चौधरी आणि महिलांच्या २०० मीटर शर्यतीत हरिता भद्रा



यांनी कांस्यपदक मिळवले. ४ ऑक्टोबरपर्यंत रंगणाऱ्या या स्पर्धेत भारताने आतापर्यंत ३७ पदकांची कमाई केली आहे. यामध्ये ४ सुवर्ण, १६ रौप्य व १७ कांस्यपदकांचा समावेश आहे. तूर्तास भारत पदकतालिकेत १२व्या क्रमांकावर असून चीन ११९ सुवर्णपदकांसह थाटात अग्रस्थानी विराजमान आहे. दरम्यान, पुरुषांच्या उंच उडीच्या अंतिम फेरीत सर्वेशने बहुतांश वेळ आघाडी घेतली होती. मात्र, २.२५ मीटरची उडी पहिल्या प्रयत्नात पार करण्यात अपयश आल्याने त्याला दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. चायनीज तैपेईच्या चाओ सुआन-फुने हे अंतर पहिल्याच प्रयत्नात पार करत सुवर्णपदक जिंकले, तर कुशारेने दुसऱ्या प्रयत्नात हे अंतर पार करत रौप्यपदक निश्चित केले. महिलांच्या लांब उडीमध्ये ॲन्सीने ६.५३ मीटरची सर्वोत्तम उडी मारून रौप्यपदक पटकावले. चीनच्या हुआंग यिंगयिंगने अखेरच्या प्रयत्नात ६.५५ मीटर उडी मारून सुवर्णपदक आपल्या नावावर केले.

# किंग कोहलीचा जलवा

**। तिरुअनंतपूरम । वृत्तसंस्था ।**

तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने विराट कोहलीच्या विक्रमासह रचलेल्या शतकी खेळीच्या जोरावर वेस्ट इंडिजला ९ षटकं हातात शिल्लक राखून तब्बल ८ विकेटने लोळवलं. प्रथम फलंदाजी करताना विंडीजने भारतासमोर ७ बाद २९५ धावांचे लक्ष्य दिले होते. भारताच्या धुरंधरांनी कोणतीही घाई न करता आपल्या कौशल्याच्या जोरावर विजयश्री खेचून आणली

तिरुअनंतपूरमच्या ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय मैदानात प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतलेल्या भारताला सुरुवातीला थोडं बॅकफूटला जावं लागलं. पॉवर प्लेमध्ये विंडिजचे फलंदाज चांगले फॉर्मात होते. पण फिरकीपटू कुलदीप यादवच्या जादुई फिरकीसमोर अखेरच्या सत्रात वेस्ट इंडिजची मधली फळी अक्षरशः ढेपाळली.



- वेस्ट इंडिजवर ८ विकेट्सनं विजय
- भारताचे सर्वच फलंदाज दिसले सर्वोत्तम लयात
- कर्णधार शुभमन गिलने ठोकले दणदणीत शतक

एक वेळ विंडीज ४०० धावा पार करते की, काय अशी परिस्थिती होती, पण भारतीय गोलंदाजांनी पुनरागमन करत त्यांच्यावर नियंत्रण मिळवले.

### किंग कोहलीचा मैदानात धुमाकूळ

हा सामना विराट कोहलीसाठी खूपच महत्त्वाचा होता. एक तर त्याला वनडेतील १५ हजार धावांचा टप्पा गाठण्यासाठी फक्त ५९ धावांची गरज होती, तर दुसरीकडे आपली विकेट राखून त्याला संघाला विजय मिळवून द्यायचा होता. त्याने अर्धशतक गाठल्यानंतर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकरनंतर १५ हजार धावांचा टप्पा पार करण्याचा दुसरा फलंदाज होण्याचा मान मिळवला.

### कुलदीपने फिरकीने सामना फिरवला

पहिल्या डावात ४० धावांवर ४ विकेट घेत फिरकीपटू कुलदीप यादवने वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना दबावात आणले. कुलदीपने विंडीजकडून शतक झळकावणारा जस्टीन ग्रेव्स (१०१)ला जास्त आक्रमक होऊ दिले नाही. तर कर्णधार शाई होप (१२), सलामीवीर जॉन कॅम्पबेल (६२) यांचा काटा ही कुलदीपनेच काढला.

किंग कोहली एवढ्यावरच थांबला नाही, त्याने खणखणीत शतक झळकावत संघाला विजयी करून देण्याचे उद्दीष्ट पूर्ण केले. त्याने ८८ चेंडूंत १० चौकार व ९ गगनचुंबी षटकार ठोकून नाबाद १३९ धावा पूर्ण केल्या. त्याला त्याआधी भारताचा कर्णधार शुभमन गिल (११०) कडून चांगली साथ लाभली. गिलने १०८ चेंडूंत १३ चौकार व १ षटकार ठोकला.

सलामीवीर रोहित शर्माने ३५ धावांत २ चौकार व ३ षटकार ठोकत भारतीय क्रिकेट चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी दिली. चौथ्या क्रमांकावर आलेला ऋतुराज गायकवाड १३ धावा करत नाबाद राहिला. भारताने विंडीजने दिलेल्या धावांचा पाठलाग अवघ्या ४१.४ षटकात २ बाद ३०० धावा करत पार केल्या.

मधल्या फळीतील अमेर जँगो वेस्ट इंडिजकडून ५८ धावा करत नाबाद राहिला. अमेरच्या खेळीमुळेच वेस्ट इंडिज सन्मानाजनक २९५ धावांचा टप्पा गाठू शकली. नाही तर भारतीय गोलंदाजांनी लय पकडत त्यांचा गेम सुरूच केला होता. पण अमेर आपली विकेट टिकवून खेळला.

कुलदीपनंतर भारतासाठी प्रसिद्ध क्रिष्णा (२ विकेट) व नितिश कुमार रेड्डी (१ विकेट) चांगली गोलंदाजी केली. रवींद्र जडेजा, गुरनुर बरार आणि नमन धीर या सामन्यात चालले नाहीत.

## बसमधून रोहित शर्मा कोसळला

**। मुंबई । प्रतिनिधी।**

स्टार खेळाडू रोहित शर्माचा मोठा अपघात टळला आहे. वेस्ट इंडिजविरोधात पहिला वन डे सामना जिंकल्यानंतर हिटमॅन सहकाऱ्यांसोबत बसमधून हॉटेलला परतत होता. त्यावेळी बसमधून उतरताना रोहित शर्मा खाली पडला. सुदैवाने यात रोहितला मोठी दुखापत झाली नाही. मात्र रोहित सोबत घडलेला प्रकार पाहून विराट कोहलीची रिॲक्शन व्हायरल होत आहे. बसमधून उतरत असताना हिटमॅन पायऱ्यांवरून घसरतो आणि खाली पडतो. त्यावेळी एक पोलीस अधिकारी आणि इतर काही कर्मचारी तातडीने रोहितच्या मदतीला धावतात. ते रोहित शर्माला उठण्यास मदत करतात. या घटनेवेळी काही खेळाडू आधीच बसमधून खाली उतरलेले आहेत. हॉटेलचा स्टाफ भारतीय टीमच्या विजयाचा जल्लोष करण्यासाठी बाहेर उभे राहिलेले होते. परंतु विराट कोहलीचे लक्ष रोहित शर्मावर गेले. तो मागे वळून रोहितला पाहताना दिसला.

## 'प्रसिद्ध श्रीवर्धन' आयोजित रील स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

'प्रसिद्ध श्रीवर्धन' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पारंपरिक गणेशोत्सव रील स्पर्धा २०२६' चा पारितोषिक वितरण सोहळा रविवारी सायंकाळी सात वाजता श्रीवर्धन येथील श्री गणपती मंदिर प्रांगणात संपन्न झाला. माझा बाप्पा... माझी भक्ती ... माझी रील! या संकल्पनेवर आधारित आयोजित केलेल्या या स्पर्धेत श्रीवर्धन तालुक्यातील अकरा स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे आयोजन प्रसाद नाझरे आणि सिद्धार्थ बोले यांनी केले होते.



या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून उद्योजक दुर्गेश शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना शिंदे म्हणाले, आजच्या डिजिटल युगात तरुण पिढी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर करत आहे. अशा वेळी प्रसिद्ध श्रीवर्धन रील माध्यमातून तरुणांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि श्रीवर्धनच्या पारंपरिक गणेशोत्सवाची भक्तिमय रूपरेषा जगासमोर आणण्यासाठी हा स्तुत्य उपक्रम राबवला आहे. आपल्या घरातील बाप्पाचे आगमन, पूजा, आरती, सजावट आणि विसर्जनाच्या क्षणांना रीलच्या माध्यमातून जपून ठेवणे, हा संस्कृती आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे. अशा उपक्रमामुळे आपल्या श्रीवर्धनच्या गणेशोत्सवाला एक नवी ओळख मिळत असून तरुणांनी आपल्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी अशा स्पर्धांमध्ये सदैव पुढाकार घ्यावा, असे सांगितले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या आकाश जागडे या विजेत्याला रूपये ५,००० रोख रक्कम, चषक व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## भारत-पाक पुन्हा आमनेसामने?

### पावसामुळे दोन्ही संघ पोहचले उपांत्य फेरीत





**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट सामन्यात उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. तसंच, श्रेयस अय्यर आणि संघाने उपांत्यपूर्व फेरीचा सामना जिंकला नाही, परंतु हा निर्णय नियमांनुसार घेण्यात आला. भारतीय टीमचे मानांकन अव्वल क्रमांकावर असल्याने हा संघ उपांत्य फेरीत दाखल झाला.

टीम इंडियाचा अफगाणिस्तानविरुद्धचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना सोमवारी होणार होता. नाणेफेक सकाळी ९:३० वाजता होणार होती, परंतु याच सुमारास सामना अधिकृतपणे रद्द करण्यात आला. खरे तर, मुसळधार पाऊस पडत होता आणि मैदान आधीच ओले झाले होते.

पाकिस्तान क्रिकेट संघानेही नियमांनुसार उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले, कारण त्यांचा हाँगकाँगविरुद्धचा उपांत्यपूर्व फेरीचा सामनाही पावसामुळे रद्द झाला होता. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, सामना रद्द झाल्यानंतर, सर्वोत्तम आयसीसी क्रमवारी असलेल्या संघाला विजेता घोषित केले जाते, आणि याच कारणामुळे भारत आणि पाकिस्तानने उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेटच्या उपांत्य फेरीत भारत आणि पाकिस्तान एकमेकांविरुद्ध खेळणार नाहीत. दोन्ही संघ वेगवेगळ्या उपांत्य फेऱ्यांमध्ये पोहोचले आहेत, त्यामुळे सुवर्णपदकासाठी ते एकमेकांविरुद्ध खेळण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचा उपांत्य फेरीचा सामना बांगलादेश किंवा मलेशियाविरुद्ध होईल, ज्याची पुष्टी मंगळवारी होईल.

## महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या अध्यक्षपदी अरुण लखानी

**। मुंबई । प्रतिनिधी।**

महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या कार्यकारिणी निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष अरुण लखानी यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्यासोबतच छत्रपती संभाजीनगरचे शिरीष बोराळकर यांची कार्याध्यक्षपदी, मंगेश काशीकर यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी, तर अनुभवी संघटक सिद्धार्थ पाटील यांची मानद सरचिटणीसपदी बिनविरोध निवड झाली आहे.

या प्रमुखांच्या नेतृत्वामुळे राज्यातील बॅडमिंटन वर्तुळाला नवी दिशा आणि भक्कम प्रशासकीय पाठबळ लाभले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरुण चौधरी यांनी अधिकृतरीत्या वैध उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली. सर्वच पदांसाठी प्रत्येकी एकच वैध अर्ज आल्यामुळे निवडणूक बिनविरोध झाली आहे.

राज्यातील बॅडमिंटनचा पाया अधिक मजबूत करण्यात आणि





आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात अरुण लखानी यांचे योगदान मोठे राहिले आहे. आता त्यांच्यासोबत कार्याध्यक्ष म्हणून शिरीष बोराळकर आणि मानद सरचिटणीस म्हणून सिद्धार्थ पाटील हे मराठवाड्याचे दोन खंदे नेतृत्व एमबीएच्या कारभाराची प्रमुख धुरा सांभाळणार आहेत. तसेच नागपूरचे मंगेश काशीकर यांच्याकडे वरिष्ठ उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. त्यांच्याकडूनही मोठ्या अपेक्षा आहेत.

या कार्यकारिणीत युवा पदाधिकारी यांची संख्या भरपूर असून संघटनेचा युवा चेहरा आगामी काळात बॅडमिंटन खेळाला एका नव्या उंचीवर नेऊन ठेवण्यास कारणीभूत ठरणार आहे.

## ईशा सिंहचा रौप्यपदकावर निशाणा



**नागोया :** भारताची स्टार नेमबाज ईशा सिंहने सोमवारी (दि.२८) आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक पटकावले. अंतिम फेरीत तिला सलग पाच शूट-ऑफचा सामना करावा लागला. अखेर अवघ्या एका शॉटने तिचे सुवर्णपदक हुकले. ईशाने पात्रता फेरीत ५८० गुण नोंदवत आठव्या क्रमांकासह अंतिम फेरी गाठली होती. उत्तर कोरियाच्या किम ह्योन सुकने शूट-ऑफमध्ये ईशाकडून पराभूत झाल्यानंतर कांस्यपदक मिळवले. तिने ३४ गुणांची नोंद केली. ईशाचे आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे दुसरे वैयक्तिक रौप्यपदक आहे.

## आराध्या बामणेची बुद्धीबळ स्पर्धेसाठी मुंबई विभागात निवड

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुका व रायगड जिल्हास्तरावर बुद्धिबळ स्पर्धेत उज्ज्वल कामगिरी केलेल्या आराध्या अमिता गजानन बामणे हिची मुंबई विभागात निवड करण्यात आली आहे.

तिच्या या यशामुळे शाळेच्या तसेच परिसराच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आराध्या बामणे ही शाळेतील विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा





स्पर्धांमध्ये नेहमीच उत्स्फूर्तपणे सहभागी होत असते. आतापर्यंत तिने विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून अनेक पारितोषिके मिळविली आहेत. विशेषतः बुद्धिबळ हा तिच्या आवडीचा खेळ असून, या खेळामध्येही तिने सातत्यपूर्ण सराव व मेहनतीच्या जोरावर अनेक पारितोषिके मिळविली आहेत.

अभ्यासातही आराध्या एक हुशार व गुणवंत विद्यार्थिनी म्हणून ओळखली जाते. अभ्यासाबरोबरच विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची छाप तिने उमटविली आहे. बुद्धिबळासारख्या खेळातून एकाग्रता, संयम, नियोजन आणि निर्णयक्षमता विकसित होत असल्याचे तिच्या कामगिरीतून दिसून येते.

विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व्यक्त केले जात आहे. तर विभागीय स्तरावरील स्पर्धेतही आराध्या उत्तम कामगिरी करून शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा** टाय-ब्रेकरमध्ये धमाका

# पुरुषांना रौप्य, महिलांना कांस्य

**। समरकंद । वृत्तसंस्था ।**

४६व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय पुरुष संघाने हंगेरीविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधत टाय-ब्रेकरच्या जोरावर रौप्यपदकावर कब्जा केला, तर महिला संघाने जॉर्जियाविरुद्ध २-२ अशी बरोबरी साधत कांस्यपदक पटकावले.

उझबेकिस्तान येथे १६ ते २७ सप्टेंबरदरम्यान यंदाची ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धा पार पडली. भारताने २०२४च्या ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही गटांत सुवर्णपदक प्राप्त केले होते. त्यामुळे यंदाही भारताचे पारडे





जेतेपदासाठी जड मानले जात होते. मात्र पुरुष गटात यजमान उझबेकिस्तानने बाजी मारली, तर महिला गटात चीनने सुवर्णपदक पटकावले. यंदा भारतीय पुरुष संघात जगज्जेता डी. गुकेश, ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद, अर्जुन इरिगेसी, निहाल सरिन आणि विदित गुजराती यांचा समावेश होता, तर श्रीनाथ नारायणन संघाचा कर्णधार होता. महिला संघात कोनेरू हम्पी, आर. वैशाली, दिव्या देशमुख, वंतिका अगरवाल आणि सविता श्री बी. यांचा समावेश असून स्वयंम मिश्रा कर्णधार होती. पुरुषांच्या विभागात उझबेकिस्तानने अंतिम फेरीत युक्रेनचा पराभव करत सुवर्णपदक मिळवले. भारतीय पुरुष संघाने १८ गुण मिळवले असून जर्मनीने हॉलंडचा पराभव केल्याने जर्मनीचेही १८ गुण झाले होते. मात्र, सरस टाय-ब्रेक गुणांच्या आधारे भारताने रौप्यपदक निश्चित केले.

महिला विभागात चीनने व्हिएतनामचा ३-१ असा पराभव करत २० गुणांसह सुवर्णपदक जिंकले.भारताच्या बी. सविथा श्रीने १० पैकी ९ गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली आणि भारताच्या कांस्यपदकात मोलाचा वाटा उचलला.

### गुकेश, दिव्याला वैयक्तिक पदके

वैयक्तिक कामगिरीत सविथा श्रीने सुवर्णपदक पटकावले. याशिवाय कोनेरू हंपी आणि वंतिका अग्रवाल यांनी कांस्य, तर दिव्या देशमुखने रौप्यपदक जिंकले. पुरुष विभागात प्रज्ञानंदने वैयक्तिक कांस्यपदक जिंकले, तर डी. गुकेश अंतिम फेरीत पराभूत झाल्याने त्याचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले. अंतिम फेरीत अर्जुन एरिगेसीने विजय मिळवला, तर प्रज्ञानंद आणि निहाल सरिन यांनी आपापले सामने बरोबरीत सोडवले.

## बिलियर्ड्समध्ये पुणेकरांचा दबदबा

**। पुणे । प्रतिनिधी ।**

डेक्कन जिमखाना क्लबच्या वतीने आयोजित व्योहर-डेक्कन जिमखाना करंडक क्यु स्पोर्ट्स आंतरक्लब लीग स्पर्धेत पुना क्लब मॅजीशियन्स्, आरसीबीसी लिजेंडस् आणि पुना क्लब किंग्ज् या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी आगेकूच केली.

पुना क्लब मॅजीशियन्स् संघाने आरसीबीसी ऑल स्टार्स संघाचा ५-० अशा एकाच फरकाने सलग दोन सामन्यांत पराभव करत शानदार दुहेरी विजय मिळवला. या विजयात विघ्नेश संघवी, दिनेश मेहतानी, कपिल पंजाबी, अनिल काकडे, अनिश केअरींग, अंगद सहानी आणि सुरज राठी या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)